- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,५३,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,४६,३५० /-
✔ चांदी : २,४८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : सोमवार, १९ ऑक्टोबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३१० | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

अभिनेता टायगर श्रॉफवर लॉरेन्स बिश्नोई गँगचा गोळीबार?

अनिल पंडित आणि हरमन संधू यांनी गोळीबाराची जबाबदारी स्वीकारत असल्याची ऑडिओ क्लीप व्हायरल, ७ राऊंड फायर

वृत्तसंस्था, मुंबई

बॉलिवूड यांच्यावरील गोळीबारानंतर काही वेळातच धमकीची ऑडिओ क्लीप व्हायरल करण्यात आली आहे. त्यामध्ये, लॉरेन्स बिश्नोई गँगने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली असून अनिल पंडित आणि हरमन संधू यांनी गोळीबाराची जबाबदारी स्वीकारत असल्याचे ऑडिओ क्लीपमध्ये ऐकू येत आहे. दरम्यान, या ऑडिओ क्लीपची पुष्टी वृत्तवाहिनी करत नाही, पण हे ऑडिओ व्हायरल करण्यात आले आहेत. तर, ऑडिओनंतर धमकीची फेसबुक पोस्ट देखील शेअर करण्यात आलीय.

मुंबईतील जुहू पोलीस स्टेशन समोरच अभिनेता टायगर श्रॉफवर गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. पोलीस स्टेशनच्या समोर असलेली गल्लीमध्ये सहा ते सात राउंड गोळीबार झाला. मिळालेल्या



माहितीनुसार टायगर श्रॉफला गोळी लागली नाही. टायगर सुखरुप असल्याची माहिती मिळत आहे, हल्ल्यानंतर टायगरने स्वतः गाडी चालून दोघांना रुग्णालयात नेले आहे. आरोपी हे बाईकवर आले होते. गोळीबार करुन ते फरार झाले आहेत. लॉरेन्स बिश्नोई गँगने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

हरमन संधू आणि अनिल पंडित यांनी या हल्ल्याची जबाबदारी घेतली असून आमचा भाऊ लॉरि बिश्नोईचं न ऐकल्यास आणि सलमान खानसोबत काम केल्यास असंच भोगावं लागेल, अशा शब्दात बॉलिवूड कलाकारांना धमकी देण्यात आलीय.

जय महाकाल, जय श्रीराम.. आम्ही फोन करुन टायगर श्रॉफला समजावलं होतं, पण त्याला समजलं नाही. त्यामुळे, आज चांगल्या पद्धतीने त्याला समजून आलं असेल. तसेच, मुंबई सिनेसृष्टीत जो कोणी आमचं ऐकणार नाही किंवा सलमान खानसोबत काम करेल, त्याचा पुढचा नंबर असेल, अशा शब्दात लॉरेन्स बिश्नोई गँगने फेसबुक पोस्टवरुन धमकी दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार आरोपींनी सहा ते सात राउंड गोळीबार केला आहे. दरम्यान, या घटनेनंतर पोलीस लगेच घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलिसांनी परिसरात नाकाबंदी लावून आरोपीचा शोध सुरु केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई पोलिस आयुक्तांना फोन करुन गोळीबाराच्या घटनेची माहिती घेतली. तसेच, तत्काळ घटनेचा वेगाने तपास करुन दोषींवर कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी पोलिस आयुक्तांना दिले आहेत. दरम्यान, मुंबईचे डिसीपी मोहित गर्ग यांनी या हल्ल्याबाबत माहिती दिली आहे. पोलिसांनी या घटनेमध्ये १५ टीम बनवल्या आहेत. टायगर श्रॉफ खासगी कामासाठी आले होते, काम करुन जात असताना त्यांच्या कारवर गोळीबार झाल्याचे गर्ग यांनी सांगितले.

थोडक्यात

कार-कंटेनरची धडक, तीन तरुण जागीच ठार

जळगाव : आते भावाला जळगाव येथे सोडून झुरखेडा (ता. धरणगाव) येथे परतणाऱ्या तरुणांच्या कारचा व कंटेनरचा अपघात होऊन ३ जण जागीच ठार झाले. हा भीषण अपघात रविवारी (१८ ऑक्टोबर) रात्री सव्वा नऊ वाजेच्या सुमारास जळगावनजीक बांभोरी पुलावर झाला. पंकज प्रकाश चौधरी (३०), रवींद्र अरुण चौधरी (३०), हरीश हिम्मत चौधरी (३२) सर्व रा. झुरखेडा, ता. धरणगाव अशी मयतांची नावे आहेत.

रवींद्र चौधरी व हरीश चौधरी यांच्या काकांचा रविवारी झुरखेडा येथे दशक्रिया विधी असल्याने यासाठी सर्व नातेवाईक आलेले होते. हा विधी झाल्यानंतर रात्री रवींद्र व हरीश हे दोघे चुलत भाऊ त्यांच्या आते भावाला सोडण्यासाठी कारने जळगावला आले होते. रात्री जळगाव येथून हे दोघे व पंकज चौधरी असे तिघेजण झुरखेडा येथे जात होते. त्यावेळी बांभोरी पुलावर कार व कंटेनर यांची धडक झाली. यात तिघांना गंभीर दुखापत झाली.

घटनास्थळी तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक शशिकांत पाटील, पाळधी आऊट पोस्टचे प्रभारी भूषण कोते यांच्यासह सहकारी पोहोचले. त्यांनी तिघही जणांना गंभीर अवस्थेत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले. या ठिकाणी डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रताप पाटील यांनी भेट दिली.

महाराष्ट्रात पुन्हा पाऊस सक्रीय

वृत्तसंस्था, मुंबई

राज्यात उन्हाचा ताप कायम आहे. तर एकीकडे राज्यातील काही भागात पावसाने हजेरी लावली आहे. पश्चिम महाराष्ट्रासह कोकणात मुसळधार पाऊस झाला आहे. राज्यातील काही भागात पावसासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात विजांसह वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळं या भागात सतर्कतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. उर्वरित राज्यात मात्र उन्हाचा ताप कायम राहणार आहे. उत्तर तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यालग ४. ५ ते ५.८ किमी उंचीदरम्यान चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. लक्षद्वीप बेटांजवळ ५.८ किमी उंचीवर चक्राकार वारे वाहत आहेत. त्यापासून केरळ, तामिळनाडू ते नैऋत्य बंगालच्या उपसागरापर्यंत कर्नाटक किनाऱ्यालगत कमी दाबाचे पट्टे सक्रीय आहेत.

१८ ऑक्टोबर रोजी मुंबईसह पालघर जिल्ह्यात हवामान कोरडे राहणार आहे. रायगड जिल्ह्यात मात्र हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात विजांचा कडकडाटासह पाऊस पडण्याचा अंदाज आहे. ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. त्यामुळं येथे यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

पश्चिम महाराष्ट्रातही पुणे, पुणे घाटमाथा आणि सातारा जिल्ह्यात काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोल्हापूर, सांगली, सोलापूर आणि घाटमाथा परिसरात विजांचा कडकडाट आणि वादळी वारे वाहू शकतात. तसंच, हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता असून या ठिकाणी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

रत्नागिरीत मुसळधार पाऊस

रत्नागिरी जिल्ह्यात परतीच्या पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. विशेषतः चिपळूणसह उत्तर रत्नागिरीत मुसळधार सरी कोसळल्याने जनजीवन विस्कळीत झाले असून, वाढत्या उकाड्यापासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, दुसरीकडे ऐन भात कापणीच्या तोंडावर हा पाऊस आल्याने शेतकरी वर्ग पूर्णपणे हवालदील झाला आहे. हातातोंडाशी आलेले पीक धोक्यात आल्यामुळे बळीराजासमोर पुन्हा एकदा मोठे संकट उभे ठाकले आहे.

सांगली जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी पावसाची हजेरी

सांगलीमध्ये ठिकठिकाणी पावसाची हजेरी लागली आहे कडेगाव आणि तासगाव तालुक्यातल्या अनेक भागात जोरदार पाऊस पडला आहे. कडेगाव तालुक्यातील देवराष्ट्रे, वडीया, रायबाग तासगावच्या बलगवडे,कवठेमहांकाळ व डफळापूरसह आसपासच्या परिसरामध्ये पाऊस पडला आहे.सांगली जिल्ह्यामध्ये सकाळपासून अनेक ठिकाणी ढगाळ वातावरण निर्माण झालं होतं,आणि दुपारपासून अनेक भागात पाऊसाची हजेरी लागली आहे. दुष्काळी परिस्थिती पडलेल्या पाऊसामुळे शेतकऱ्यांबरोबर सर्वसामान्यांना मिळाला आहे.

काँग्रेसला जनतेने तीन वेळा रिजेक्ट केले आहे : एकनाथ शिंदे

दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती

काँग्रेसचे नेते, कार्यकर्ते निराश झाले आहेत. दिल्लीत आणि गल्लीत आंदोलन काय करतात. सरकार बदलणार, अशा वल्गना करतात. पण, सरकार असे बदलत असते का? सरकार कुणाचे यावे, हे जनता ठरवत असते. कुणाला सरकारमध्ये बसवायचे आणि कुणाला पाडायचे याचा निर्णय जनताच घेत असते. जनतेने तर तीन वेळा काँग्रेसला नाकारले आहे, अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे बोलताना केली.

एकनाथ शिंदे म्हणाले, शिक्षक मतदारसंघाची निवडणूक असो किंवा अन्य कुठलीही निवडणूक. कुणाचा करेक्ट कार्यक्रम करायचा, हे शिक्षक बरोबर ठरवत असतात. निवडणुकांमध्ये शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असते. त्यामुळे शिक्षकांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याचे आमचे धोरण आहे. कुणी तरी काँग्रेसच्या नेत्याने महायुतीचे डोळे



काढण्याची भाषा केली, मला त्यांना एकच सांगायचे आहे. महायुतीचे डोळे काढणे सोपे आहे का, २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी काय केले हे सर्वांना माहित आहे. या महाराष्ट्रातल्या जनतेच्या मनातील सरकार आणले. शिक्षकांच्या, लाडक्या बहिणींच्या प्रश्नांसाठी सरकार सदैव तत्पर राहणार आहे.

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ येथील सिपना महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित सभेत बोलताना एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर निशाणा साधला. एकनाथ शिंदे म्हणाले, महाविकास आघाडीने अनेक वर्षे देशाचा बट्टयाबोळ केला. २०१४ पुर्वीची परिस्थिती बघा, या देशात बॉम्बस्फोट होत होते. कितीतरी घोटाळे आपण पाहिले. २ जी स्पेक्ट्रम, कॉमनवेल्थ घोटाळा, बोफोर्स घोटाळा, चारा घोटाळा, अगदी गोबर घोटाळा केला. काहीही सोडले नाही. आता देश पुढे चालला आहे. आर्थिक महासत्तेकडे आपण चाललो आहोत, ही पोटदुखी चालू आहे. अराजकता पसरवण्याचे, शांतता बिघडवण्याचे प्रयत्न हे लोक करीत आहेत.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शंभरावे मराठी साहित्य संमेलन साधेपणाने होणार

पुणे : आगामी शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि त्यापूर्वी विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेली नांदी संमेलन ही राज्यातील सध्याची दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कमीत कमी खर्चात आणि साधेपणाने करण्यात येणार असल्याची माहिती अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी पत्रकार परिषदेत सांगितली. मात्र ही संमेलने वैचारिक दृष्ट्या समृध्द करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत असे नमूद करुन ते म्हणाले, विविध ठिकाणी होणाऱ्या नांदी संमेलनासाठी मार्गदर्शक प्रणाली तयार केली आहे.तसेच ती कमीत कमी खर्चात करण्याचा प्रयत्न असणार आहे. तशा प्रकारच्या सूचना आयोजक यांना देण्यात आल्या आहेत. नांदी संमेलनासाठी राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी पाच कोटी निधीची घोषणा केली आहे त्यातील दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. या निधीतून नांदी संमेलनाचे आयोजन करण्यात येणार आहे असे ते म्हणाले.

नांदी संमेलनांमधून साहित्याचा प्रसार आणि वाचनसंस्कृतीला चालना देणे अपेक्षित आहे. सध्याची परिस्थिती लक्षात घेता खर्चावर नियंत्रण ठेवून साहित्यकेंद्री कार्यक्रम आयोजित करण्याची भूमिका घेण्यात आली आहे, या संमेलनांतील अध्यक्षीय भाषणांचे संकलन करून त्यांचा दस्तऐवज तयार करण्यात येणार असल्याचेही सोमण यांनी नमूद केले.

कापसासोबत गांजाचे आंतरपीक, शेतकऱ्याला अटक

यवतमाळ येथील घटना, ५८ लाखांचा मुद्देमाल जप्त



दै. सिंहवाणी वृत्त, यवतमाळ

जिल्ह्यात कापूस व तुरीच्या पिकात आंतरपिक म्हणून प्रतिबंधक गांजाची लागवड केली जात आहे. रविवारी पांढरकवडा पोलिसांनी खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीवरून दहेली तांडा व जिरा-मिरा शिवारातील तीन शेतात धाड टाकून तब्बल ५८ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. तर तीन शेतकऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली.

दहेली तांडा येथे ८० वर्षीय शेतकरी भीकू सुख्या चव्हाण यांनी कापसाच्या पिकासोबत गांजाची लागवड केल्याची माहिती मिळाली. ठाणेदार लहू तावरे यांनी पथकाला पाठवून त्यांची खातरजमा केली. नंतर १७ ऑक्टोबर रोजी शासकीय पंच व कृषी अधिकारी यांना सोबत घेऊन शेतात धाड टाकली. गांजाची झाडे उपटून जप्त करण्यात आली. त्याचे वजन दोन क्विंटल ४६० ग्रॅम इतके भरले. ही कारवाई सुरू असतानाच जिरा-मिरा येथे काहींनी अतिक्रमण केलेल्या जागेवरच्या शेतात कापसासोबतच गांजाची लागवड केल्याची माहिती मिळाली. लिसांनी तेथे जावून पडताळणी केल्यानंतर गांजाची झाडे असल्याची खात्री पटली. या शेतात प्रताप तुळशीराम राठोड (७०) यांनी गांजा लागवड केल्याचे पुढे आले. पोलिसांनी एक क्विंटल ७३५ ग्रॅम गांजा जप्त केला. त्यानंतर सुदाम झितरु रामपुरे (६०) यांनी देखील त्याच्या शेतात गांजाच्या झाडांची लागवड केली असल्याचे पुढे आले. त्यांनी कापूस व तुरीच्या पिकात गांजाच्या झाडांची लागवड केली होती. पोलिसांनी एकूण एक क्विंटल १० किलो ७५५ ग्रॅम गांजा जप्त केला. या तिन्ही शेतकऱ्यांविरोधात पोलिसांनी अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे. तिन्ही कारवाईमध्ये ५८ लाख रुपये बाजारमूल्य असलेला गांजा जप्त केला आहे.

दुष्काळात महागाईचे संकट; अन्नधान्य, तेल, डाळीपासून भाज्या महागल्या

वृत्तसंस्था, मुंबई

राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत अन्नधान्याच्या किमतीमध्ये वाढ झाल्यास त्याचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या जीवनावर होत आहे. महागाईचा दर ४.८३ टक्क्यांवरून ५.५४ टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचे दिलेल्या आकडेवारीत नमूद करण्यात आले आहे. भाजीपाला आणि अन्नधान्याच्या किमतींमधील वाढ हे यामागील प्रमुख कारण मानले जात आहे. विशेष म्हणजे, सरकारच्या देखरेखीखाली असलेल्या ४२ जीवनावश्यक वस्तूंपैकी ४१ वस्तूंच्या किमतीत गेल्या वर्षभरात वाढ झाली असून सर्वसामान्य जनता त्रस्त झाली आहे.



सणासुदीच्या काळातच जीवनावश्यक वस्तू महागल्याने सर्वसामान्यांच्या घरखर्चाचे गणित बिघडत आहे. राज्यात एकीकडे दुष्काळाचे सावट, तर दुसरीकडे वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. गहू, तांदूळ आणि विविध प्रकारच्या डाळींचे वाढलेल्या किमती पाहता सर्वसामान्यांनी जगायचे तरी कसे असा प्रश्न पडला आहे. बाजारभावानुसार, चणाडाळीचा दर १०० रुपये, मूगडाळ १३०, तूरडाळ १५०, चवळी डाळ १४०, तर मसूर डाळ १०० रुपये किलोपर्यंत पोहोचली आहे.

डाळींसोबतच ज्वारी, बाजरी, तांदूळ आणि गव्हाचे दरही सामान्य ग्राहकांच्या चिंतेत भर घालत आहेत. गहू आणि लोकवन गहू यांचे दर प्रतिकिलो ३५ रुपये असल्याने कुटुंबाच्या महिन्याच्या किराणा खर्चात वाढ होत आहे.

कांद्याच्या दरात ११३ टक्क्यांची वाढ

महागाईच्या या लाटेत कांद्याच्या किमतीने सर्वाधिक झेप घेतल्याचे सांगितले जात आहे. कांद्याच्या दरात तब्बल ११३ टक्क्यांची वाढ झाली असून, एक किलो कांद्याचा भाव ५३ रुपयांपर्यंत पोहोचला आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे कांद्याच्या दरात आणखी वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

खाद्यातेल आणि साखरही महाग

कांद्याबरोबरच खाद्य तेल यांमध्ये सूर्यफूल तेल, मोहरीचे तेल, पाम तेल, सोयाबीन तेल याच्या किमती वाढले आहेत. दिवाळीमध्ये साखरेच्या किमतीमध्येही वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

फळे, भाज्या महागल्या

नवरात्रोत्सव सुरू असल्याने फळे आणि उपवासाचे पदार्थ महागले आहेत. साबूदाना, शेंगदाणे, भगर इत्यादी महाग झाले आहेत. फळांमध्ये सफरचंद, केळी भाव खात आहेत. मेथी, पालक, कोथिंबिरी महागली आहे. घरखर्च, किराणा आणि भाजीपाल्यासाठी अधिक रक्कम खर्च करावी लागत असल्याने इतर गरजांसाठीची बचत कमी होण्याची शक्यता आहे. सणासुदीच्या काळात वाढलेली ही महागाई नागरिकांसाठी आर्थिक आव्हान ठरत आहे.

संपादकीय लेखणीतून...

धोका दहशतवादाचा

दुबईहून तेल अवीवकडे निघालेल्या विमानात सहवैमानिकाने भारतीय कॉप्टन स्मित मच्छार यांच्यावर केलेल्या हल्ल्यामुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. कॉप्टन स्मित यांनी दाखवलेले असीम साहस निर्विवादपणे देशाची मान उंचावणारे आहे आणि संपूर्ण जगभरातून त्यांच्यावर स्तुतिसुमने उधळली जात आहेत. हा दहशतवादी हल्लाच होता, असा स्पष्ट निर्णय यूएई सरकारने दिला आहे. इस्रायलनेही ही बाब स्पष्ट केली आहे. त्यामुळे प्रश्न उरतो तो त्यामागच्या उद्देशाचा. अब्राहम करारामुळे संयुक्त अरब अमिराती आणि इस्रायलमध्ये निर्माण झालेल्या संबंधांना धक्का देण्याचा हा प्रयत्न होता का, या घटनेने पश्चिम आशियातील संघर्षात नॉन स्टेट ॲक्टर्स किंवा राज्ये पुन्हा सक्रिय होत आहेत का, यांचा विचार गांभीर्याने करावा लागणार आहे.

दुबईहून तेल अवीवकडे निघालेल्या एका प्रवासी विमानात घडलेली घटना माझ्या दृष्टीने एखाद्या चमत्कारापेक्षा कमी नाही. या विमानात आजवरच्या नागरी विमानवाहतुकीच्या इतिहासात कधीही न घडलेल्या काही घटना घडल्या आणि भारतीय कॉप्टन स्मित मच्छार यांनी अतुलनीय साहसाने सुमारे १८० प्रवाशांचे प्राण वाचवले. त्यापैकी बहुसंख्य प्रवासी इस्रायली होते. स्वतः गंभीर जखमी झाल्यानंतरही कॉप्टन स्मित यांनी प्रसंगावधान आणि समयसूचकता दाखवत ज्या शौर्याने हा प्रसंग हाताळला त्याला तोड नाही. या घटनेबाबत इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी हा दहशतवादी आणि 'लोन वुल्फ' स्वरूपाचा हल्ला असल्याचे म्हटले आहे. इस्रायलची गुप्तचर संस्था मोसादही या प्रकरणाचा तपासात सहभागी असल्याचे सांगितले जात आहे. फ्लाय दुबईच्या विमानात कॉप्टन स्मित मच्छार यांच्यावर केलेला हल्ला हा दहशतवादी हल्लाच होता, असा स्पष्ट निर्णय यूएई सरकारने दिला आहे. तसेच या ओमानी सहवैमानिकाने नाव हमाम अल-हमामी असे असल्याचेही जाहीर केले आहे.

या वैमानिकाचा उद्देश ९/११च्या धर्तीवर विमानाचा वापर करून मोठा हल्ला करण्याचा होता असे आता पुढे आले आहे. अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर ११ सप्टेंबर २००१ ला प्रवासी विमान हायजॅक करूनच भीषण दहशतवादी हल्ला करण्यात आला होता. नुकतीच या हल्ल्याला २५ वर्षे पूर्ण झाली. तशाच प्रकारे दुबईहून निघालेल्या विमानातील १५० पेक्षा अधिक इस्रायली प्रवाशांना लक्ष्य करून विमान इस्रायलमध्ये एखाद्या ठिकाणी पाडायचे आणि त्यातून आणखी मोठी जीवितहानी घडवण्याचा हा डाव यशस्वी झाला असता तर दहशतवादाच्या जागतिक इतिहासात एका भयावह अध्यायाची नोंद झाली असती. कॉप्टन स्मित यांच्या धैर्यामुळे तो टळला. ऑक्टोबर महिना पश्चिम आशियाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. २०२३ मध्ये ऑक्टोबर महिन्यातच हमासने इस्रायलवर अत्यंत गंभीर हिंसक हल्ला केला आणि त्यानंतर इस्रायल-हमास संघर्ष तीव्र झाला. पुढे अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षाची पार्श्वभूमीही तयार झाली. या महत्त्वाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर हा प्रकार घडला असल्याने त्यामागे काही संदेश देण्याचा उद्देश होता का, हे तपासावे लागेल.

दुसरा मुद्दा पश्चिम आशियातील सध्याच्या स्फोटक वातावरणाचा आहे. अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष पूर्णपणे शमलेला नाही. होर्मुझ सामुद्रधुनीशी संबंधित तणाव कायम आहे. अमेरिका आणि इराणकडून परस्परांना धमक्या दिल्या जात आहेत. सौदी अरेबियातील पूर्व-पश्चिम पाईपलाईनला फटका बसला आहे. येमेनमधील हुती आणि सौदी अरेबिया यांच्यातील संघर्षही तीव्र आहे. तेलाच्या पुरवठा साखळीवर त्याचा परिणाम झालेला आहे. अशा अस्थिर वातावरणात ही घटना घडली असल्याने आतापर्यंत प्रामुख्याने सरकारी घटकांमध्ये असलेला संघर्ष आता बिगर-सरकारी घटक किंवा दहशतवादी संघटनांपर्यंत पोहोचतो आहे का, हा प्रश्न उपस्थित होतो. या घटनेचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे विमानाचा मार्ग. हे विमान संयुक्त अरब अमिरातीतील दुबईहून निघाले होते आणि इस्रायलमधील तेल अवीवकडे जात होते. संयुक्त अरब अमिराती आणि इस्रायल यांच्यातील संबंध गेल्या काही वर्षांत बदलले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांच्या पहिल्या अध्यक्षीय कार्यकाळात अब्राहम करार करण्यात आला. या कराराच्या माध्यमातून इस्रायल आणि सुन्नी अरब देशांना जवळ आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. पश्चिम आशियातील पारंपरिक राजकारण अनेक दशके सुन्नी अरब देश विरुद्ध इस्रायल अशा स्वरूपाचे राहिले. त्यांच्यामध्ये मोठी युद्धे झाली. इस्रायलने काही अरब प्रदेशांवर ताबा मिळविला आणि त्यातील काही प्रदेश नंतर परतही केले.

पुन्हा सुटलेत वारे..!

विशाल देवतळे
हिंगणा, जि. नागपूर

पाहता पाहता पदवीधर शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीचे वारे पुन्हा नव्याने दरवळायला सुरू झाले. निवडणूक म्हटले की प्रत्येक पक्ष, प्रत्येक उमेदवार आपापल्या परीने मी किती प्रभावी आणि निवडणुकीसाठी खंबीर उमेदवार म्हणून आवश्यक आहे याची सिद्धता आपल्या मतदारांसमोर निरंतर ठेवण्याचा प्रयत्न करतात! इतरांपेक्षा मीच कसा श्रेष्ठ आहे..! इतरांपेक्षा मीच कसा तुमच्या प्रत्येक गोष्टीला समजून उमजून न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहोत..? याच एका मागे एक शिफारशी, आव्हाने, प्रलोभने प्रत्येक मतदारांसमोर प्रत्येक निवडणुकीत उभा असणारा प्रत्येक उमेदवार ठेवण्याचा प्रयत्न करतो आणि ते वाजवी आहे. पण...आपण मतदारांसमोर ठेवलेल्या कित्येक बाबींना पूर्ण करतो किंवा केले आहे याची एक स्वतः चाचपडणी उमेदवार या नात्याने प्रत्येकाने करणे तितकेच महत्त्वाचे आहे. जे उमेदवार या पदवीधर संघाच्या निवडणुकीसाठी उभे आहेत त्यांनी आवर्जून आपण केलेल्या कामाचे धडपडीचे शिक्षक बांधवाप्रती उपसलेल्या कार्य निष्ठेचे आत्मपरीक्षण करायला पाहिजे. जर या चाचपडणीत निम्म्यापेक्षा जास्त बाबींना आपण स्वयंसिद्ध परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला असेल तरच मी लायक उमेदवार आहोत अन्यथा नाही असेच उमजून घ्यायला हवे.

स्वतःच्या आत्मचिंतनात आयुष्यात एखाद्या तरी शिक्षकाला जो शिक्षक खाजगी शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून दाबावाचा बळी ठरला गेलेल्या दाबावाचा बळी ठरला असेल! चुकीच्या शासकीय धोरणांच्या निर्णायामुळे बळी पडला असेल! बळजबरीच्या शिक्षण प्रणालीकडून वा गैर जबाबदार नेत्यांकडून जो नेता 'उचलली जीभ लावली टाळ्याला' पद्धतीने विधान करतो अनं शिक्षकांना वेठीस धरण्याचा प्रयत्न करतो अशा अन्यायग्रस्त विधाना विरूद्ध आवाज उठवण्यासाठी पुढे आला असेल अशा एखाद्या तरी शिक्षकाला जर उभ्या आयुष्यात जो न्याय देण्यासाठी शिक्षक बांधवांसोबत उभा राहिला असेल तरच मी शिक्षक पदवीधर संघाच्या निवडणुकीसाठी पात्र उमेदवार आहोत असे आवर्जून समजायला पाहिजे. अन्यथा या निवडणुकीचे बाशिंग न बांधलेलेच बरे..!

जसजशी निवडणूकीची रणधुमाळी जवळजवळ येत आहे तसतसे या उमेदवाराचा त्या उमेदवाराचा! या पक्षाचा त्या पक्षाचा! मेसेज,फोन मोबाईलच्या पटलावरती झळकतांना दरवळतांना दिसून येतात. पण जशीही निवडणूक संपली आणि पुढची निवडणूक येईपर्यंत मग हे सर्व उमेदवार कोठे व कसे गायब होतात? एक मतदार या नात्याने मनात साहजिकच प्रश्न येतो. मतदारांनी विश्वासाच्या आधारावर उमेदवारांना पसंती क्रम देऊन निवडून आणायचे आणि पसंतीनुसार निवडून आलेल्या उमेदवारांनी शिक्षकांच्या हितसंबंधी प्रश्नांना ऐनवेळी ऐनठिकाणी दांडी मारायची. यावेळी तरी आमचा हा 'उमेदवार' शिक्षक बांधवांच्या आयुष्याच्या वळणावरती वेणाऱ्या प्रत्येक प्रश्नाला नक्कीच सोडवेल! आमच्या अडचणींना न्याय देईल! परंतु पसंतीक्रम प्राप्त करून निवडून आल्यानंतर हेच उमेदवार जेव्हा शिक्षक बांधव आपल्या समस्या घेऊन यांच्या घरापर्यंत पोहोचतात तेव्हा यातील बरेचसे उमेदवार धड बोलायलाही तयार नसतात. का तेव्हा आमची ओळख यांना पटत नाही? तेव्हा यांना आमची का गरज वाटत नाही? मतांसाठी वारेमाप हाजीहाजी करणारे हेच नेते शिक्षकांच्या उपस्थितीला का वाऱ्यावर सोडतात? निवडून आल्यावर यांना डोंगरदऱ्या रानवेलीचे अनुभवाची आहे तर कशाला उगाच हा निवडणूकीचा खटाटोप!

जर आपल्याच मतदार शिक्षक बांधवांना जर ओळखत नसाल तर आम्ही का म्हणून एक उमेदवार म्हणून आपली का पसंती करावी? जर शिक्षक नेते होऊन शिक्षकांच्या समस्याच जाणून घ्यायला तयार नसाल तर कशाला उगाच हा पसारा!

तेव्हा माझ्या मतदार शिक्षक बंधू भगिनींनो आपण अशा पदवीधर शिक्षक मतदार संघातून उमेदवाराची निवड करा जो खऱ्या अर्थाने आणि मनापासून शिक्षक बांधवांच्या प्रश्नांसाठी समर्पित राहून शिक्षकांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध सदैव आवाज उठवणार असेल. जो उमेदवार एका हाकेने शिक्षकांच्या हितासाठी पाठीशी उभे राहत असेल त्यालाच निवडून द्या..! त्यालाच आपला पसंती क्रम द्या अन्यथा काही आवश्यकता नाही सारेच एकाच माळ्यावचे मणी असतात.

आपण निवडणुकीच्या माध्यमातून या उमेदवारांचा पसंतीक्रमाचा विचार करायचा आणि यांनी केवळ आपल्या अपेक्षांना,अडी अडचणींना केवळ केराची टोपली दाखवायची हे योग्य नाही. तेव्हा बांधवांनो या होऊ घातलेल्या निवडणूकीच्या माध्यमातून विचार करुनच योग्य समर्पक असा शिक्षकनेता पसंतीस आणा यातच आपल्या सर्वांचेच सौख्य सामावले आहे.

- ९७६४९१५१७५

भारतीय लोकशाहीवरील आंतरराष्ट्रीय निदर्शने आणि प्रवासी भारतीयांचे वाढते ध्रुवीकरण

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भारतीय लोकशाही, जागतिक पातळीवर होणारी आंतरराष्ट्रीय निदर्शने आणि प्रवासी भारतीय समुदायातील वाढते ध्रुवीकरण हा सध्याच्या आंतरराष्ट्रीय राजकीय विश्लेषणाचा एक अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा विषय बनला आहे. ३.५ कोटींहून अधिक लोकसंख्या असलेला भारतीय प्रवासी समुदाय आज जागतिक स्तरावर आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या प्रचंड शक्तिशाली आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत भारतातील अंतर्गत राजकीय घडामोडी, कायदे आणि निवडणूक सुधारणांचे पडसाद परदेशातही मोठ्या प्रमाणावर उमटत असून, त्यामुळे अनिवासी भारतीयांमध्ये वैचारिक दरी निर्माण झाली आहे. भारतीय लोकशाहीतील अंतर्गत राजकीय घडामोडींचे आणि वैचारिक संघर्षाचे पडसाद आता आंतरराष्ट्रीय स्तरावर अत्यंत तीव्रतेने उमटताना दिसत आहेत. या वाढत्या राजकीय ध्रुवीकरणाचे एक ज्वलंत उदाहरण १६ ऑक्टोबर २०२६ रोजी लंडनमधील भारतीय उच्चायुक्तालयाबाहेर पाहायला मिळाले. या दिवशी 'स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया - युनायटेड किंगडम' आणि इतर आंदोलनाला वैचारिक आणि राजकीय पाठबळावर प्रत्युत्तर देण्यासाठी १६ ऑक्टोबर २०२६ रोजीच भारतीय समुदायातील सरकार समर्थक गटाने उच्चायुक्तालयाबाहेर मोठी गर्दी केली होती, ज्याचे सविस्तर वृत्त १७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध झाले. या गटाने विद्यमान सरकारच्या आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समर्थनार्थ 'भारत माता की जय' आणि 'जय श्रीराम' अशी जोरदार घोषणाबाजी करत एक मोठे प्रतिआंदोलन उभे केले. एकाच वेळी दोन्ही परस्परविरोधी गट समोरासमोर आल्यामुळे दूतावासाबाहेर काही काळ कमालीचा तणाव निर्माण झाला होता. मोदी समर्थकांनी असा युक्तिवाद केला की, सद्यस्थितीतील सरकार हे लोकशाही मागर्ने आणि प्रचंड बहुमताने निवडून आलेले सरकार आहे, ज्याने गरिबांसाठी ३० कोटी बँक खाती उघडण्यासारखी अनेक कल्याणकारी कामे केली आहेत. जर कोणाला निवडणूक प्रक्रियेबाबत तक्रार असेल, तर त्यांनी सर्वोच्च न्यायालयासारख्या घटनात्मक मार्गाचा अवलंब करावा, असे आवाहन या समर्थकांनी केले. 'रीच इंडिया' यांसारख्या प्रवासी भारतीयांच्या संघटनांनी तर या आंदोलक विद्यार्थ्यांना कडक शब्दांत सुनावले की, त्यांनी परदेशात भारताची प्रतिमा मलिन करण्याचे काम थांबवावे आणि देशांतर्गत राजकारणाची चर्चा देशाच्या हद्दीतच करावी. पुराव्यांशिवाय परदेशात निदर्शने करणे म्हणजे केवळ देशाच्या प्रगतीबद्दलचा द्वेष असल्याची भावना या गटाने व्यक्त केली.

या दोन परस्परविरोधी आंदोलनांची धग शांत होत नाही तोच, ब्रिटनच्या राजधानीत आणखी एका मोठ्या राजकीय घडामोडीची भर पडली. भारतातील राजकारणावर सातत्याने भाष्य करणारा प्रसिद्ध युट्यूबर ध्रुव राठी आणि त्याच्या समर्थकांनी १८ ऑक्टोबर २०२६ रोजी लंडनमधील 'पार्लमेंट स्क्वेअर' येथे आणखी एका मोठ्या आंदोलनाचे आयोजन केले. भारतातील वाढते राजकीय आणि सामाजिक प्रश्न, तसेच निवडणूक प्रक्रियेतील कथित त्रुटी यांवर आंतरराष्ट्रीय लक्ष वेधण्यासाठी संसदेच्या चौकात हे समर्थक एकत्र येत आहेत. विद्यार्थी संघटनांच्या मर्यादित निदर्शनांपासून सुरू झालेला हा विरोध आता सोशल मीडियावरील प्रभावशाली व्यक्तींच्या माध्यमातून एका मोठ्या आणि संघटित मोहिमेचे रूप घेत आहे. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी होणारे हे आंदोलन परदेशातील भारतीय समुदायामधील वाढत्या राजकीय दुफळीचे अत्यंत स्पष्ट आणि गंभीर रूप जगासमोर मांडत आहे.

परदेशात होणाऱ्या या सर्व राजकीय घडामोडींचे भारतावर आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत पातळीवर अत्यंत दूरगामी परिणाम होणार आहेत. १६ ऑक्टोबर २०२६ ते १८ ऑक्टोबर २०२६ या अवघ्या तीन दिवसांच्या कालावधीत लंडनसारख्या जागतिक शहरात घडलेल्या या निदर्शनांमुळे भारताच्या अंतर्गत प्रश्नांकडे आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमे आणि मानवाधिकार संस्थांचे थेट लक्ष वेधले गेले आहे. या घटनांमधून सर्वात चिंतेची बाब समोर येते ती म्हणजे परदेशात स्थायिक झालेल्या अनिवासी भारतीय नागरिकांमध्ये निर्माण झालेली मोठी वैचारिक फूट. पूर्वी केवळ सांस्कृतिक सण आणि उत्सवांपुरता एकत्र येणारा हा प्रवासी भारतीय समुदाय आता देशांतर्गत राजकारणावरून आणि विचारधारेवरून दोन अत्यंत स्पष्ट आणि आक्रमक गटांत विभागला गेला आहे.

लंडनमधील हा संघर्ष केवळ एका आठवड्याचा उद्रेक नसून, तो भारतीय लोकशाहीची सद्यस्थिती, निवडणूक यंत्रणेची स्वायत्तता आणि जागतिक स्तरावरील भारताचे राजकीय स्थान यांवर प्रदीर्घ काळ चालणाऱ्या वैचारिक युद्धाचा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

थोडक्यात सांगायचे तर, भारतीय लोकशाहीची ताकद आणि तिचा विस्तार आता केवळ भारताच्या भौगोलिक सीमांपुरता मर्यादित राहिलेला नाही. प्रवासी भारतीय समुदायातील हे ध्रुवीकरण एका बाजूला जागतिक पातळीवरील भारतीयांची वाढती राजकीय सजगता दाखवते, तर दुसऱ्या बाजूला वैचारिक सहिष्णुतेचा अभाव आणि वाढत्या अंतर्गत दुराव्याकडे बोट दाखवते.

वैश्विक मंचावर भारताला 'लोकशाहीची जननी' म्हणून सादर केले जात असतानाच, आंतरराष्ट्रीय स्तरावर होणारी टीका भारतासमोरील आव्हाने दर्शवते. दुसरीकडे, प्रवासी भारतीयांचे ध्रुवीकरण हे भारतीय राजकारणाचा जागतिक विस्तार दर्शवणारे असले, तरी यामुळे परदेशातील भारतीय समुदायाची एकसंधता धोक्यात येण्याचा धोका निर्माण झाला आहे.

- ९५६१५९५३०६

निर्णायक सामन्यात पावसाचा व्यत्यय, मालिका बरोबरीत!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील टी२० मालिकेतील पाचवा आणि अंतिम सामना बंगळूरु येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर पावसामुळे मध्येच सोडून देण्यात आला. परिणामतः हि मालिका दोन-दोन अशी बरोबरीत सुटली व दोन तपानंतर भारताविरुद्ध मालिका जिंकण्याच्या विंडीजच्या स मनसुब्यांवर अक्षरशः धो -धो पाणी पडले. तर भारतालाही मायदेशात अपराजित राहाण्याची मालिका अखंडीत राखता आली. वेस्ट इंडिजकडे भारतात भारताविरुद्ध २४ वर्षांनंतर द्विपक्षीय मालिका जिंकण्याची संधी होती. ही प्रतीक्षा पुढेही कायम राहील. वेस्ट इंडिजच्या संघाने २००२ मध्ये ७ सामन्यांची एकदिवसीय मालिका ४-३ ने जिंकली होती. त्या मालिकेचा निकालही शेवटच्या सामन्यात लागला होता.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या निर्णायक सामन्यात भारतीय सलामीवीर अभिषेक शर्माने ४ चेंडूंत ६ धावांची खेळी केली, तर संजू सॅमसनने ७ चेंडूंत १६ धावा केल्या. ईशान किशनने १० चेंडूंत ३० धावा केल्या, तर कर्णधार श्रेयस अय्यरने १४ चेंडूंत २२ धावांची खेळी केली. दुसरीकडे, तिलक वर्माने ६ चेंडूंत ७ धावा केल्या. नमन धीर ६ चेंडूंत २४ धावा करून नाबाद राहिला. वेस्ट इंडिजकडून कीमो पॉल आणि शमार स्प्रिंगर यांनी प्रत्येकी २-२, तर शमार जोसेफने १ गडी बाद केला. या सामन्यात वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले होते.

भारताने केले दोन बदल

भारताने आपल्या अंतिम अकरा खेळाडूंमध्ये दोन बदल केले. भुवनेश्वर कुमार आणि शिवम दुबे यांना अंतिम अकरामध्ये सामील करण्यात आले, तर नितीश कुमार रेड्डी आणि मयंक यादव यांना संघातून बाहेर ठेवण्यात आले. दुसरीकडे, वेस्ट इंडिजने या सामन्यासाठी आपल्या अंतिम अकरा खेळाडूंमध्ये कोणताही बदल केला नाही. शाई होपने २६१ धावा केल्या आहेत.

शाई होपने या मालिकेत आतापर्यंत चार डावांमध्ये २६१ धावा केल्या आहेत. जर त्याने पाचव्या सामन्यात आणखी २५ धावा केल्या असत्या, तर तो टी-२० मालिकेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला असता. सध्या हा विक्रम पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझमच्या नावावर आहे, ज्याने २०२२ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या सात सामन्यांच्या टी-२० मालिकेत २८५ धावा केल्या होत्या. पण येथे पावसाने होपच्या आशांवर पाणी फेरले

मात्र, बाबर आझमने हा विक्रम सात सामन्यांच्या मालिकेत प्रस्थापित केला होता. त्याने २०२२ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत २८५ धावा केल्या होत्या. दुसरीकडे, शाई होपने दोन शतके आणि एका अर्धशतकाच्या मदतीने चार डावांमध्ये २६१ धावा केल्या आहेत. जर त्याने पाचव्या सामन्यात आणखी २५ धावा केल्या, तर तो बाबर आझमला मागे टाकेल. पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम आधीच शाई होपच्या नावावर आहे. यापूर्वी, सूर्यकुमार यादवने २०२५ मध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेत २४२ धावा केल्या होत्या. तर दुसरीकडे, पाकिस्तानच्या साहिबजादा फरहानने श्रीलंकेविरुद्ध तीन सामन्यांमध्ये २३८ धावा केल्या होत्या.

शाई होपचे स्वप्न स्वप्नच राहिले

शाई होपला इतिहास रचण्याची एक मोठी संधी होती आहे. बंगळूरुमधील पाचवा टी-२० सामना पावसामुळे रद्द झाल्यामुळे, त्याचे भारताला भारतात ह मालिकेत हरविण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या शाई होपने मागील एकदिवसीय मालिकेतही शानदार फलंदाजी केली होती.

शनिवारी बंगळूरु येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील मालिकेतील अंतिम आणि निर्णायक टी-२० आंतरराष्ट्रीय सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. पाच सामन्यांची ही मालिका २-२ अशी बरोबरीत होती. रात्री १०:१६ वाजता पावसामुळे सामना रद्द करण्यात आला, तेव्हा भारताने ७.४ षटकांत ५ गडी गमावून ११८ धावा केल्या होत्या. मालिका बरोबरीत सुटली असली तरी, ती एका गोष्टीसाठी नेहमीच लक्षात राहील: गोलंदाजांची धुलाई. या मालिकेत, दोन्ही संघांच्या गोलंदाजांनी यापूर्वीच्या कोणत्याही टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेपेक्षा जास्त धावा दिल्या. संपूर्ण मालिकेत फलंदाजांनी १०.९८ च्या रनरेटने गोलंदाजांची धुलाई केली.

हे लक्षात घेतले पाहिजे की भारत विरुद्ध वेस्ट इंडिज द्विपक्षीय टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेत दोन्ही संघांचा एकत्रित रनरेट १०.९८ होता. हा विक्रम यापूर्वी याच वर्षाच्या सुरुवातीला भारत विरुद्ध न्यूझीलंड टी२० मालिकेत नोंदवला गेला होता, जेव्हा भारतीय आणि किवी फलंदाजांनी १०.५७ च्या रनरेटने गोलंदाजांची धुलाई केली होती. अव्वल पाच द्विपक्षीय मालिकांचा विचार केल्यास, या सर्व मालिकांमध्ये प्रति षटक ९ पेक्षा जास्त धावा झाल्या आहेत. सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे, अव्वल पाच संघांमध्ये भारत आणि वेस्ट इंडिज हेच असे संघ आहेत जे या मालिकेत सर्वाधिक वेळा, प्रत्येकी तीन वेळा, सहभागी झाले आहेत.

पूर्ण सदस्य संघांमधील द्विपक्षीय टी२० मालिकेत सर्वाधिक रनरेट

वेस्ट इंडिजचा भारत दौरा, २०२६ - १०.९८

न्यूझीलंडचा भारत दौरा, २०२६ - १०.५७

ऑस्ट्रेलियाचा वेस्ट इंडिज दौरा, २०२५ - ९.६३

भारताचा इंग्लंड दौरा, २०२६ - ९.३६

इंग्लंडचा वेस्ट इंडिज दौरा, २०२३ - २४, ९.२१

भुवनेश्वर संघात परतला पण ...

चार वर्षांनंतर भारतीय संघात पुनरागमन करणाऱ्या स्विंग गोलंदाज भुवनेश्वर कुमारने इतिहास रचला आहे. बंगळूरु येथे भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील ५ व्या टी२० सामन्यासाठी भुवनेश्वर कुमारचा प्लेइंग इलेव्हनमध्ये समावेश करण्यात आला, ज्यामुळे तो सर्वाधिक सामन्यांच्या कालावधीनंतर संघात परतणारा भारतीय खेळाडू ठरला. शेवटचा सामना २० नोव्हेंबर २०२२ रोजी खेळला होता.

भुवनेश्वर कुमारचा शेवटचा टी२० सामना २० नोव्हेंबर २०२२ रोजी न्यूझीलंडविरुद्ध होता. त्या सामन्यात त्याने चार षटकांत १२ धावा देऊन एक बळी घेतला, परंतु २०२२ च्या टी२० विश्वचषकातील खराब कामगिरीमुळे त्याला नंतर संघातून वगळण्यात आले. नोव्हेंबर २०२२ ते ऑक्टोबर २०२६ या तीन वर्षे आणि ३४० दिवसांच्या कालावधीत (१४२५ दिवस), १०६ सामन्यांच्या मोठ्या कालावधीनंतर त्याने टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन केले. मात्र पावसामुळे विंडीजचा डाव सुरूच झाला नाही व भुवनेश्वरचे मोठ्या अंतरानंतर पहिला आंतरराष्ट्रीय चेंडू टाकण्याचे स्वप्न पुन्हा एकदा लांबणीवर पडले.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

नागपूर जिल्ह्यातील धरणांत ५१.५५ टक्के पाणीसाठा

पेंच प्रकल्पातून नागपूर शहराच्या पाणीपुरवठ्यात कपात नाही, वडगाव, वेणा, मकरधोकडा व सुराबर्डी प्रकल्पांतून कपातीचे निर्देश, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेत वार्षिक पाणी आरक्षण बैठक

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर जिल्ह्यातील मोठ्या, मध्यम व लघु अशा एकूण ७७ धरणांमध्ये १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सरासरी ५१.५५ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. गतवर्षी याच दिवशी हा साठा ९८.१८ टक्के होता. यंदा धरणांमधील पाणीसाठ्यात मोठी घट झाल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन भवन येथे वार्षिक पाणी आरक्षण सभा आयोजित करण्यात आली. या बैठकीत विविध प्रकल्पांतील पाणीसाठ्याचा आढावा घेऊन पिण्याच्या व औद्योगिक पाणी वापराबाबत आवश्यक निर्देश देण्यात आले.

या बैठकीला जलसंपदा विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महानगरपालिका तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील विविध प्रकल्पांमधील सद्यस्थितीतील पाणीसाठा आणि शासनाच्या ५ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या निर्णयातील निर्देशांची माहिती दिली.

पेंचमधून नागपूरच्या पाणीपुरवठ्यात कपात नाही

पेंच मोठ्या प्रकल्पात १५ ऑक्टोबर २०२६ रोजी ४८.४८ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. या प्रकल्पातून नागपूर महानगरपालिकेला पाणी आरक्षण मंजूर असून, उपलब्ध पाणीसाठ्याच्या आधारे ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता राहण्याची स्थिती आहे. त्यामुळे नागपूर महानगरपालिकेच्या पाणी मागणीत सध्या कोणतीही कपात करण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट करून जिल्हाधिकाऱ्यांनी पाणीपुरवठ्यात कपात न करण्याचे निर्देश दिले.



चार प्रकल्पांमध्ये पाणी कपातीचे निर्देश

वडगाव, वेणा, मकरधोकडा आणि सुराबर्डी या प्रकल्पांमधील पाणीसाठा व भविष्यातील पाणी उपलब्धतेचा विचार करून जिल्हाधिकाऱ्यांनी पाणी मागणीत कपात करण्याचे निर्देश दिले.

वडगाव धरणात ५५.४८ टक्के पाणीसाठा उपलब्ध असून, पिण्याच्या पाण्याच्या मागणीत १० टक्के आणि औद्योगिक पाण्याच्या मागणीत १० टक्के कपात करण्याचे निर्देश देण्यात आले. वेणा मध्यम प्रकल्पात ६१.१० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. या प्रकल्पातून पिण्याच्या पाण्याच्या मागणीत ३० टक्के, तर औद्योगिक पाण्याच्या मागणीत ४० टक्के कपात करण्यास सांगण्यात आले.

मकरधोकडा मध्यम प्रकल्पात २७.५९ टक्के पाणीसाठा असून, पिण्याच्या पाण्याच्या मागणीत १० टक्के आणि औद्योगिक पाण्याच्या मागणीत २० टक्के कपात करण्याचे निर्देश आहेत. सुराबर्डी लघु प्रकल्पात ३८.९६ टक्के पाणीसाठा उपलब्ध असून, पिण्याच्या पाण्याच्या मागणीत ४० टक्के कपात करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

इतर प्रकल्पांसाठीही पाणी वापराचे नियोजन

अन्य प्रकल्पांमध्ये बिगर सिंचन पाणी मागणीच्या अनुषंगाने उपलब्धतेचा विचार करून शासन निर्णयातील सूचनांनुसार पिण्याच्या पाण्याच्या मागणीत १० टक्के कपात करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच औद्योगिक आस्थापनांनी एकूण पाणी वापरापैकी ३० टक्के पाण्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रण करता यावे, यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित कराव्यात, अशा सूचनाही देण्यात आल्या.

भविष्यात एखाद्या प्रकल्पातून पिण्याच्या पाण्यासाठी आकस्मिक मागणी प्राप्त झाल्यास किंवा त्यासाठी नदीपात्रात पाणी सोडण्याची मागणी झाल्यास, पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय पाणी सोडू नये, असे निर्देश जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले.

पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन

जिल्ह्यातील उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करता नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने व जबाबदारीने वापर करावा. तसेच एलनिनोच्या प्रभावामुळे उष्णतेत वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन स्वतःच्या कुटुंबीयांसह आप्तस्वकीय, पक्षी आणि पशुधनाची योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले.

थोडक्यात

स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत सहभागी होऊन आपला व आपल्या गावाचं नावलौकिक करावे : ठाणेदार महेश आंधळे



दै. सिंहवाणी वृत्त, कामठी

स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करून विविध स्पर्धेत सहभागी होऊन आपला व आपल्या गावाचा नाव लौकिक करण्याचे आव्हान नवीन कामठीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश आंधळे यांनी तालुक्यातील येरखेडा येथील माँ वैष्णव नवदुर्गा उत्सव मंडळाच्यावतीने आयोजित विविध स्पर्धेच्या पुरस्कार वितरण सोहळ्यात मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश आंधळे यांचे हस्ते दुर्गा मातेची पूजा अर्चना करून पुरस्कार वितरण सोहळ्याला सुरुवात करण्यात आली यावेळी येरखेडा नगरपंचायत चे बांधकाम सभापती मनीष कारेमोरे पत्रकार सुदाम राखडे अमित ठाकूर,प्रणय राखडे, ललित गभने,दिनेश पांडे ,सुरेंद्र वाजूरकर,सारंग चौधरी ,पियुष गजभिये,संजय खोडे,प्रा. मनीष मुळे ,अनुप आगरे,श्रीकांत गिरे, सुनील पारधी मुरलीधर पारधी, साईप्रसाद गायकवाड, तुषार नासरे, भुवन नासरे आकाश क्षीरसागर उपस्थित होते.

पाहुण्यांच्या हस्ते बँकिंग स्पर्धा परीक्षेत प्राविण्य सूचित राज्यात प्रथम स्थान प्राप्त करणारी इसीका देवेंद्र गवते चा पाहुण्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ ,स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करून विविध स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुषमा राखडे यांनी केले. संचालन स्नेहल रहमतकर यांनी केले व आभार प्रदर्शन अर्चना गभणे यांनी मानले कार्यक्रमाला मंगला कारेमोरे,प्रियंका गवते, लता गवते, वंदना वाजुरकर, स्नेहल रहमतकर,सीमा नाटकर,वैष्णवी कोठे, सुषमा हेलोंढे,प्रांजल फेंडर, अस्मिता ठाकूर,मेघा गिरे, काजल आग्रे, पूजा चौधरी,आयोध्या राठोड, गायत्री पवार ,अनु खरवडे,नूतन मुळे,प्राजक्ता ढोले,पायल पारधी, सेजल क्षीरसागर,निकिता क्षीरसागर, मंजू इंगोले,प्रतिभा गेडाम, हर्षा रोकडे, दीपा सोनटक्के, मयुरी रेवतकर सह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

आजनी येथे तुळजाभवानी मंदिराची प्रतिकृती ठरते आहे आकर्षण



दै. सिंहवाणी वृत्त, कामठी

कामठी तालुक्यातील आजनी येथे नवरात्री निमित्त सध्या उत्साहाचे वातावरण असून दरवर्षी विविध देखाव्यातून भाविकांचे मनोरंजन करणाऱ्या सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळाने व जय बजरंग क्रीडा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी कुठल्याही कारागिरीचे शिक्षण घेतले नसतांना देखील यंदा तुळजाभवानी मंदिराची आकर्षक प्रतिकृती उभारलेली आहे. त्यामुळे केलेली रोषणाई आणि प्रतिकृती बघण्यासाठी भाविकांची गर्दी वाढलेली आहे.

विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असलेल्या या गावात सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळाच्या माता दुर्गेच्या मूर्तीसह गावातील रेणूका माता मंदिर आणि मातामाय देवस्थान येथे कार्यकर्त्यांच्या माध्यमातून महाप्रसाद तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याने गावात सध्या धार्मिक वातावरण निर्माण झाले आहे. विजयादशमीला रावण पुतळा दहन कार्यक्रमाचे आयोजन सुद्धा मंडळाच्या वतीने करण्यात येत असते. शिवाय नवरात्र संपल्यानंतर २३ ऑक्टोबर रोजी कामठी येथील देवी भक्त धीरज पांडे यांच्या जस गायनाचा कार्यक्रम कार्यकर्त्यांनी आयोजित केलेला आहे. या जस गायनाचा लाभ घेण्याची विनंती तिन्ही मंडळांच्या कार्यकर्त्यांनी केली आहे.

स्व. गयाबाई मदने व स्व. मनोरमा माहोरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मदने परिवाराकडून पाटणसावंगी ग्रामपंचायतीला इलेक्ट्रिक शवपेटी भेट



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

तालुक्यातील पाटणसावंगी येथील स्व. गयाबाई रतनलाल मदने व स्व. मनोरमा अरुणराव माहोरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मदने परिवारातर्फे पाटणसावंगी ग्रामपंचायतीला इलेक्ट्रिक शवपेटी भेट देण्यात आली. या सामाजिक उपक्रमातून दिवंगतांच्या स्मृती जपत ग्रामस्थांसाठी उपयुक्त सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यावेळी मदने परिवारातील दिलीप मदने, हंसाताई मदने, सत्यम मदने, निर्णय मदने व संस्कार मदने उपस्थित होते.

ग्रामपंचायतीच्या वतीने इलेक्ट्रिक शवपेटी स्वीकारताना ग्रामपंचायतीचे प्रशासक तथा विस्तार अधिकारी संदीप उमाटे, ग्रामविकास अधिकारी प्रदीप चामाटे, माजी सरपंच रोशनी ठाकरे, माजी सरपंच अजय केदार, जानराव केदार, सुधीर ठाकरे, ज्ञानेश्वर झोड तसेच ग्रामपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते. मदने परिवाराने दिवंगतांच्या स्मृतीप्रित्यर्थ केलेल्या या उपक्रमामुळे गावातील नागरिकांना अंत्यविधीच्या वेळी पार्थिव शरीर सुरक्षित ठेवण्यासाठी सुविधा उपलब्ध होणार आहे. या उपक्रमातून मदने परिवाराने सामाजिक बांधिलकी जपत ग्रामस्थांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे.

"माझे गाव माझे आरोग्य संपन्न गाव" अभियान यशस्वीरित्या राबविण्यासाठी अधिकारी कर्मचाऱ्यांनी सहकार्य करावे : गटविकास अधिकारी पियुष डोंगरे



दै. सिंहवाणी वृत्त, कामठी

"माझं गाव माझे आरोग्य संपन्न "ग्रामीण भागात यशस्वीरित्या राबविण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन गटविकास अधिकारी पियुष डोंगरे यांनी महाराष्ट्र शासन आरोग्य विभागाच्या वतीने कामठी पंचायत समिती सभागृहात आयोजित प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटनाप्रसंगी मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

कामठी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी पंकज पियुष डोंगरे यांचे हस्ते दीप प्रज्वलन व राष्ट्रपिता महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आले. यावेळी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. माधुरी काळे उपजिल्हा रुग्णालय, अधीक्षक डॉ. निशांत शेख तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश मोटे, प्राथमिक आरोग्य केंद्र, गुमथी येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. तारीख अन्सारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, गुमथळा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहनिष तिवारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, भुगाव येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. साबिया नाज उपस्थित होते. आरोग्य शिबिरात डॉ.माधुरी काळे, डॉ निशांत शेख,डॉ सुरेश मोटे मार्गदर्शन करताना म्हणाले,'माझे गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाचा मुख्य उद्देश गावपातळीवर आरोग्यविषयक जनजागृती वाढविणे, नागरिकांना आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब करण्यासाठी प्रोत्साहित करणे, स्वच्छता व प्रतिबंधात्मक आरोग्यसेवांना चालना देणे आणि विविध शासकीय विभागांच्या समन्वयातून ग्रामीण भागातील आरोग्यव्यवस्था अधिक सक्षम करणे हा आहे.

गावाचा विकास साधताना नागरिकांचे आरोग्य केंद्रस्थानी ठेवून प्रत्येक गाव स्वच्छ, निरोगी आणि आरोग्यसंपन्न बनविण्यासाठी ग्रामपंचायत, आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभाग आणि इतर संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करणे विविध विषयावर मार्गदर्शन केले प्रशिक्षण शिबिराला तालुक्यातील सरपंच, ग्रामविकास अधिकारी,आरोग्य सहाय्यक, समुदाय आरोग्य अधिकारी, समूह संघटक,आशा गटप्रवर्तक,अंगणवाडी पर्यवेक्षिका,आरोग्य सेवक सेविका,आशा स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे संचालन शेखर घाटोळे यांनी केले व आभार प्रदर्शन वीरेंद्र कुमार सोमकुवर यांनी मांडले कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी येळे, साळवे, चौधरी, गजबे, सिलेकर, राखडे, माकडे आदींनी परिश्रम घेतले.

श्री निकेतन आर्ट्स कॉमर्स कॉलेजमध्ये गरबा महोत्सव उत्साहात

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

श्री निकेतन आर्ट्स कॉमर्स कॉलेज, नागपूर येथे सांस्कृतिक विभागाच्या वतीने गरबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मेधा कानेटकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. राजेंद्र मालोकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सांस्कृतिक विभागाचे समन्वयक राजेश कनिरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.




कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. मेधा कानेटकर म्हणाल्या, शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान संपादन करणे नव्हे, तर आपल्या संस्कृतीशी नाते जोडणे, कलागुणांना वाव देणे आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधणे होय. अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये एकता, सहकार्य, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो. सांस्कृतिक विभागाच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे गरबा महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सांस्कृतिक विभागाचे समन्वयक कनिरे सर यांनी मार्गदर्शन केले.

बचत पाण्याची गरज काळाची : ग्रामगीताचार्य गणेश धर्माळे

दै. सिंहवाणी वृत्त, श्रीरामपूर

संतांना दूरदृष्टी असते त्यामुळे संत ज्ञानेश्वर महाराज, जगतगुरू तुकाराम महाराज, संत सेवालाल महाराज, वैराग्यमूर्ती गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सर्व संत महापुरुषांनी सुजलाम सुफलाम भूमी व मुबलक पाणी असतांनी आपणास पर्यावरण व पाण्याचे जतन करण्याचा उपदेश केला आपण त्याकडे दुर्लक्ष केले त्यासाठी संत महापुरुष यांना डोक्यावर घेण्यापेक्षा त्यांचे विचार डोक्यात घेऊन त्याप्रमाणे वागणे आवश्यक आहे पाणी अनमोल असून जपून वापरा असे प्रतिपादन गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर अध्यक्ष गणेश धर्माळे यांनी कोपरा येथे केले.

गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर वतीने पुसद तालुक्यात विविध ठिकाणी सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या उपक्रमास उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून यावेळी कोपरा गावी सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या घेण्यात आली. यावेळी माजी सरपंच शंकर राठोड, तालुका सेवाधिकारी शिवशंकर नागरे,भगत साहेब, कासार समाजभूषण मोहन नागपूरकर,नारायण पवार, गुरुदेव सेवा मंडळ कोपरा अध्यक्ष गजानन चव्हाण, मंडळाचे अध्यक्ष गणेश धर्माळे प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते अधिष्ठान पूजन करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.



स्मिता धर्माळे यांच्या आदेशावरून शिस्तबद्ध सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली यावेळी प्रार्थनेचे महत्व विषद करतांना धर्माळे पुढे म्हणाले की, सर्व ग्रामाचे संघटन प्रार्थनेमुळे झाले आता कोणतीही समस्या उद्भवली त्यावर ऊपाय करता येईल, आपल्या गावाला मंदिर, तीर्थस्थान समजून कार्य करा, लोकोपयोगी कार्य सुरू करा, जात धर्म पंथाच्या बेड्या तोडून माणुसकीचा धर्म आचरणात आणा, छोटे वाद,तंटे गावातच मिटवा,पाण्याचे योग्य नियोजन करून जपून वापरा घरोघरी वृक्ष लाऊन संवर्धन करा यावेळी त्यांनी अनेक संत महापुरुष यांची उदाहरणे दिली.

यानंतर भजनांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला हार्मोनियम अशोक भगत,नरेंद्र गेडाम, माधव पवार तबला अनिल अस्वार, गौतम बरडे, किशोर राऊत खंजिरी सुरेश कदम यांनी तर साथसंगत पंजाब गडदे, प्रकाश बेद्रे, कैलास मस्के, बाबुलाल चव्हाण, श्यामराव देशमाने, दिलीप गव्हाणे, गजानन गव्हाणकर, माधव गव्हाणे, साहेबराव सरकटे,नामदेव गव्हाणे, संजय हटकर,दगडू गव्हाणे, सागर केळकर,सतीश चव्हाण दिनेश पवार, सोनटक्के कांबळे, विनोद पवार, महिला प्रतिनिधी डॉ. देवश्री काळबांडे, कमल गडदे,मुक्ता काळबांडे यांनी केली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नारायण पवार,लक्ष्मी पवार, भाग्यश्री चव्हाण,वंदना राठोड, योगिता चव्हाण,वर्षा पवार, पंचफुलाबाई हटकर,राणू पवार, यशोदाबाई चव्हाण,बेबी पवार, सिंधूबाई गव्हाणे,मुक्ता पवार, लीलाबाई गव्हाणे,पार्वती पवार, यांनी अथक परिश्रम घेतले, महाआरती राष्ट्रवंदना जयघोष घेऊन महाप्रसादाचे कार्यक्रमाची सांगता झाली, कार्यक्रमास गावकऱ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला.

नियोजन भवन येथे अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विशेष आरोग्य शिबिर

भोंगळे चॅरीटेबल ट्रस्टच्या सहयोगाने आयोजन, अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतला लाभ

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने, भोंगळे चॅरिटेबल फाउंडेशन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे जिल्हा प्रशासन वैद्यकीय आणि आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद उपस्थित होते.



यावेळी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.शालिग्राम भोंगळे यांच्याहस्ते जिल्हाधिकाऱ्यांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या शिबिरात जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी व अधिकाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. फाऊंडेशनच्यावतीने प्राथमिक आरोग्य तपासणी, रक्तातील साखरेची चाचणी, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि औषधांचे मोफत वाटप करण्यात आले.

या उपक्रमाला वैद्यकीय क्षेत्राचाही भक्कम पाठिंबा मिळाला. अधिकृत क्लिनिकल पार्टनर असलेल्या सूर्या मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. सत्यम सुपारे आणि डॉ. नयन सुपारे, तसेच विवेक नगराळे हे अतिथी म्हणून उपस्थित होते. फाऊंडेशनचे सचिव यश भोंगळे आणि कोषाध्यक्षा डॉ. प्रीती भोंगळे यांच्याहस्ते अतिथींचा सत्कार करण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी आपल्या जिल्ह्याच्या प्रगतीसाठी पडद्यामागे अथक परिश्रम घेतात. हे आरोग्य शिबीर म्हणजे सेवेप्रती एक नम्र प्रयत्न होता, असे श्री. भोंगळे यावेळी म्हणाले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे यांच्यासह अधिकारी, कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

थोडक्यात

गरबा-डांडियाच्या रंगात रंगली सारस्वतपूर नगरी

फ्री स्टाईल डान्स अकॅडमी आणि किड्स झी स्कूलच्या गरबा नाइट्स महोत्सवात बालरुपात अवतरल्या नवदुर्गा, पारंपारिक वेशभूषा, गरबा व नृत्यांनी उपस्थितांना केले मंत्रमुग्ध



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

नवरात्रोत्सवात पारंपरिक गरबा नृत्याची स्वतःची वेगळी ओळख आहे. या नवरात्रीत ठिकठिकाणी गरब्याचे आयोजन करण्यात येत आहे. जिथे दररोज हजारो लोक गरबा नृत्य करून देवी जगदंबेची पूजा करण्यासाठी जमतात. या गरबा इव्हेंटमध्ये आयोजकांकडून बेस्ट लुक, बेस्ट डांस, बेस्ट चिल्ड्रन पेरेंट्स डांस, बेस्ट कपल,बेस्ट ग्रुप असे विविध श्रेणींमध्ये बक्षीस वितरित केली जात आहे. संध्याकाळ जसजशी जवळ येते तसतशी गरबा स्थळावरील प्रत्येकजण, मग ते लहान मुले असो वा तरुण, आकर्षक कपडे परिधान करून कार्यक्रमस्थळी पोहोचतात आणि दररोज नवीन थीमवर सादरीकरण करतात. दि. १७ ऑक्टोबरला अस्सल महाराष्ट्रीय बाण्यात सहभागी स्पर्धकांनी आयोजनात रंगत आणली तर किड्स झी स्कूल च्या चिमुकल्या विद्यार्थ्यांची नवदुर्गेचें रुप धारन करुण मंचावर येताच टाळ्यांचा कडकडाट जणूकाही नवदुर्गाचं. सदर आयोजनात अवतरल्याचा आभास करवून दीला शहरातील बालाजी सेलिब्रेशन लॉन येथे फ्री स्टाईल डान्स अकॅडमी आणि किड्स झी स्कूलच्या वतीने आयोजित भव्य गरबा नाईट्स मधे शालेय विद्यार्थी आणि त्यांचे पालक तसेच शहरातील तरुण-तरुणींना खूप आवडत आहेत कार्यक्रम चे शुभारंभ सावनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष किशोर ढुढेले, युवा व्यवसायी व किड्स झी स्कुलचे संस्थापक सुनील कमाले, पत्रकार पीयुष झिंझुवाडीया, किड्स झी स्कुल च्या मुख्याध्यापिका डॉ. प्रियंका कमाले यांनी वीधीवत पूजा ,आरती व दिप प्रज्वलन करुण केले. तर सदर आयोजनाला सावनेर पोलीस स्टेशन च्या पोलीस निरिक्षक ऋतुजा जाधव तसेच पोलीस निरिक्षक कानगुले यांनी भेट देत स्पर्धकांचे उत्साहवर्धन केले. याप्रसंगी आपले विचार व्यक्त करत सोशल मिडिया चा वापर करत असतांना सोशल मिडिया,ऑनलाईन तसेच सायबर गुन्हापासुन सावध राहण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले

या भव्य कार्यक्रमाची शहरात सर्वत्र चर्चा होत असून या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी सर्वजण उत्सुक आहेत. या कार्यक्रमचे मुख्य आयोजक कुणाल भरडे, मुख्याध्यापिका प्रियंका कमाले, सुनील कमाले, कामाक्षी कुंभरे तसेच कार्यक्रमच्या यशस्वी करिता किड्सजीचे सर्व शिक्षक आणि कर्मचारी व फ्री स्टाइल डांस अकादमीची टीम आदि परिश्रम घेत आहेत.

भारत सेलिब्रेशन हॉल, कोराडी-महादुलामध्ये पदवीधरांचा मेळावा संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी-मिलिंद गाडेकर

कोराडी भारत सेलिब्रेशन हॉल मध्ये ११बजता भाजपा, राष्ट्रवादी(अजीत), आरपीआय, शिवसेना शिंदे गुट महायुतिचे उम्मीदवार सुधाकर कोहले यांच्या प्रचारनीमित्याने मेळाव्याचे भव्य आयोजन भाजपा कोराडी जिल्हा परिषदतर्फे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात मुख्य मार्गदर्शक महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. याप्रसंगी नागपूर जिल्हाध्यक्ष ग्रामीण आनंदराव राऊत, आमदार डॉ.आशिष देशमुख सावनेर विधानसभा क्षेत्र, पदवीधरचे उमेदवार सुधाकर कोहळे, भाजप महामंत्री नागपूर जिल्हा अनिल निदान, महादुला नगरपंचायतच्या प्रथम नागरिक अध्यक्ष हेमलता मनोज सावजी, नागपूर भाजपा उपाध्यक्ष राजेश रंगारी, भाजपा महादुला यूनिट अध्यक्ष सचिन पाटिल, माजी भाजपा अध्यक्ष महादुला प्रीतम लोहासरवा, यांची मंचावर उपस्थिती होती. पदवीधर सुजान नागरिक मंडळींनी आपले मत, महायुती चे उमेदवार सुधाकर कोहळे यांनाच प्रथम पसंतीचे नंबर १ असे सरळ उभी रेषा असते तसे लिहावे. बरोबर मधोमध चिकाटीच्या मध्यभागी लिहावे. मागील निवडणुकीत १ नंबरचे सरळ रेषेत न लिहिता एक नंबरच्या आकड्यावर खूप रंगरंगोटी करू नये. पण, त्यावेळी पदवीधरने तसा प्रकार केल्याने १२०००, आपली मते रद्द झाली आणि तितक्याच फरकाने आपले उमेदवार पडले होते. त्यामुळे सरळ उभी रेषा चौकटीतच लिहिण्यात यावी खूप काळजी घेऊन मतदान करायचे आहे, असे जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत यांनी सांगितले. महसूलमंत्र्यांनी पदवीधरांना गुरुमंत्र देताना सांगितले की, भाजप जनसामान्य गरीब वंचितचा पाठीराखा पक्ष आहे. काँग्रेस पक्षाच्या नेत्यांना जनतेच्या प्रश्न माहिती नाहीत. बेरोजगार मुलांची माथी भडकवण्याचे आणि देश अस्थिर करण्याचे काळ करते, उमेदवार सुधाकर कोहळे शिक्षकी पेश्यातील उच्च शिक्षा विभूषित आहेत, आपण अशा कार्यकर्त्याला आपला प्रतिनिधी म्हणून निवडून द्या, असे आवाहन केले. यावेळी पदवीधर संपर्क प्रमुख ब्रह्मा काळे, हर्शल हिंगणीकर, विश्वजित चौहान, राहुल नागदेवे, रवि पारधी, समाजसेवक मनोज सावजी, अभिजीत ढेंगरे, जितू भगत, दीपक जैन, अजय सोलंकी, बबलू धुलस आणि मोठ्या प्रमाणात पदवीधर मतदार बंधू भगिनी उपस्थित होते.

स्व. भानुताई गडकरी डायग्नोस्टिक सेंटर आता अमरावतीत

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व कांचन गडकरी यांच्या उपस्थितीत श्री शिवाजी शिक्षण संस्थेसोबत सामंजस्य करार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



नागपुरातील गोरगरिब जनतेला अत्यंत माफक दरात वैद्यकीय चाचण्यांची सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर स्व. भानुताई गडकरी मेमोरिअल डायग्नोस्टिक सेंटर आता अमरावतीत देखील उभारले जाणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून उभारलेले हे केंद्र अमरावती जिल्ह्यातील जनतेच्या सेवेत दाखल होणार आहे.

नितीन गडकरी व कांचन गडकरी यांच्या उपस्थितीत रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्था व अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, कार्यकारीणी सदस्य हेमंत काळमेघ, सचिव व्ही.जी. ठाकरे, डॉ. पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. ए.टी. देशमुख, संस्थेचे सदस्य डॉ. बबन चौधरी, स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेचे सचिव अविनाश घुशे, श्रीकांत गडकरी, दिलीप धोटे, हेमंत गडकरी, संजय टेकाडे, सुरेश चिचघरे, संदीप शास्त्री, प्राचार्य डॉ. होमराज देशमुख, प्रा. आर. वाय. देशमुख, अतुल मंडलेकर, राम जोशी, डॉ. स्वप्नील पोतदार यांची उपस्थिती होती.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी नागपुरातील स्व. भानुताई गडकरी डायग्नोस्टिक सेंटरला भेट दिली होती. सेंटरच्या माध्यमातून गोरगरिब जनतेला मोठ्या प्रमाणात वैद्यकीय चाचण्यांची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. त्यानंतर अमरावतीत देखील अश्यापद्धतीचे केंद्र व्हावे, अशी कल्पना संस्थेने नितीन गडकरी यांच्याकडे मांडली. त्यानुसार अमरावती येथे श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात स्व. भानुताई गडकरी मेमोरिअल डायग्नोस्टिक सेंटर उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.याठिकाणी एमआरआय, सीटी स्कॅन, डिजीटल एक्स-रे, डायलिसीस, सोनोग्राफी, मॅमोग्राफी, सर्व प्रकारच्या पॅथॉलॉजी चाचण्या आदींची सुविधा असणार आहे.

अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आदिवासीबहूल गावे आहेत. तेथील रुग्णांना अमरावती शहरात अत्यंत माफक दरात निदान सेवा उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे, अशी भावना नितीन गडकरी यांनी व्यक्त केली.

अचूक, वैध मतदानासाठी काळजी घेणे आवश्यक

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक, मतदान कसे करावे याबाबत सूचना जारी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघासाठी दि.२३ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. सदर मतदान मतपत्रिकेद्वारे होणार असल्याने अचूक मतदान होण्यासाठी मतदारांनी काळजी घेऊन मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मतदारांनी मतदान करण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने पुरविलेले जांभळ्या रंगाचे स्केच पेनच वापरावे. अन्य कोणतेही पेन, पेन्सिल, बॉलपॉईन्ट पेन किंवा अन्य कोणतेही लेखनाचे साधन मतदानासाठी वापरू नये, कारण त्यामुळे मतपत्रिका अवैध ठरेल. उमेदवाराच्या नावाच्या स्तंभासमोर पसंतीक्रम म्हणून असलेल्या स्तंभामध्ये तुम्ही प्रथम पसंतीचा उमेदवार म्हणून निवडलेल्या उमेदवाराच्या नावासमोर १ असा आकडा लिहून मतदान करा. हा १ आकडा फक्त एकाच उमेदवाराच्या नावासमोर घालावा. उर्वरित उमेदवारांबाबतचा तुमचा पुढील पसंतीक्रम, अशा उमेदवारांच्या नावासमोर असलेल्या पसंतीक्रम या स्तंभामध्ये तुमच्या पसंतीक्रमानुसार २, ३, ४ इत्यादी आकडे घालून दर्शवा. जेवढे उमेदवार निवडणूक लढवत असतील तेवढे पसंतीक्रम देता येतील.

कोणत्याही उमेदवाराच्या नावासमोर फक्त एकच आकडा घातलेला आहे, याची खात्री करावी, तसेच तोच आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर घातलेला नाही याची देखील खात्री करणे गरजेचे आहे. हा पसंतीक्रम फक्त १, २, ३ इत्यादी आकड्यांमध्येच दर्शवावा. एक, दोन, तीन इत्यादी शब्दांमध्ये दर्शवू नका. हे आकडे भारतीय अंकांच्या १, २, ३ इत्यादींसारख्या आंतरराष्ट्रीय रूपात किंवा I, II, III इत्यादींसारख्या रोमन रूपात किंवा १, २, ३ अशा देवनागरी रूपात किंवा संविधानाच्या अनुसूची आठमधील मान्यता दिलेल्या कोणत्याही एका भारतीय भाषेमध्ये वापरण्यात येणाऱ्या रूपामध्ये चिन्हांकित करता येतील.

मतपत्रिकेवर तुमचे नाव लिहू नका किंवा अन्य शब्द लिहू नका किंवा तुमची स्वाक्षरी वा आद्याक्षरे करू नका. तसेच तुमच्या अंगठ्याचा ठसा देखील उमटवू नका. यामुळे मतपत्रिका अवैध ठरेल. पसंतीक्रम दर्शविण्यासाठी निवडीच्या उमेदवाराच्या नावासमोर किंवा अशी खूण करू नका, अशा मतपत्रिका बाद करण्यात येतील. वर स्पष्ट केल्याप्रमाणे तुमचा पसंतीक्रम फक्त १, २, ३ इत्यादी आकड्यांमध्येच दर्शवा. मतपत्रिका वैध ठरण्यासाठी उमेदवारीपैकी एका उमेदवारासमोर १ हा आकडा लिहून पहिली पसंती दर्शविणे आवश्यक आहे. इतर पसंतीक्रम देणे अनिवार्य नसून ऐच्छिक आहे.

मतदारांनी काळजीपूर्वक मतदान न केल्यास मतपत्रिका अवैध ठरू शकते. त्यात १ हा आकडा घातलेला नसेल, १ हा आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर घातलेला असेल, १ हा आकडा, तो कोणत्या उमेदवाराला देण्यासाठी घातलेला आहे याबाबत संदेह निर्माण होईल, अशा प्रकारे घातलेला असेल, एकाच उमेदवाराच्या नावासमोर १ आणि त्याबरोबर २, ३ इत्यादी आकडे देखील घातलेले असतील, पसंतीक्रम आकड्यांऐवजी शब्दांमध्ये दर्शवलेला असेल, मतदाराची ओळख पटू शकेल अशी कोणतीही खूण किंवा लेखन असेल आणि असे आकडे घालण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने दिलेल्या जांभळ्या रंगाच्या स्केच पेन व्यतिरिक्त अन्य साधनाने कोणताही आकडा घातलेला असेल तर मतपत्रिका अवैध ठरेल, त्यामुळे मतदारांना अचूक, वैध मतदान होण्यासाठी काळजीपूर्वक मतदान करावे, असे आवाहन निवडणूक विभागाने केले आहे.

वि. आ. बुवा यांच्या विनोदी कथांनी रंगला 'साहित्य कट्टा'

विदर्भ साहित्य संघात स्थानिक लेखकांच्या विनोदी कथांचे सादरीकरण



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विदर्भ साहित्य संघाच्या वतीने दर महिन्याला आयोजित करण्यात येणारा 'साहित्य कट्टा' हा कार्यक्रम शनिवारी विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयात उत्साहात पार पडला. सुप्रसिद्ध विनोदी लेखक वि. आ. बुवा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित या साहित्य कट्टयात त्यांच्या स्थानिक लेखकांच्या विनोदी कथांसह इतरही लेखकांच्या कथांचे सादरीकरण करण्यात आले. या कार्यक्रमात अलका मोकाशी, नीता खोत, अरुंधती वैद्य आणि स्वाती मोहरीर यांनी सहभाग घेतला. अलका मोकाशी यांनी 'ध. चा. मा.' ही विनोदी कथा सादर केली. पत्नीचा प्रियकर शोधण्याची जबाबदारी घेतलेल्या एका गुप्तहेराभोवती या कथेचे कथानक फिरते. नीता खोत यांनी 'एकसारखा देवप्रस्न्न' ही कथा सादर केली. श्रद्धा, समाधान आणि विवेक यांचे महत्त्व या कथेतून अधोरेखित करण्यात आले.

अरुंधती वैद्य यांनी 'आमचं घर, सर्वांचं घर' ही विनोदी कथा सादर केली. घराचे खरे सौंदर्य केवळ वास्तूमध्ये नसून तेथे राहणाऱ्या माणसांच्या जीवनशैलीत, सवयींत आणि विचारांत असते, हा विचार या कथेतून मांडण्यात आला. स्वाती मोहरीर यांनी 'माझे काही नातेवाईक शत्रू' ही कथा सादर केली. नात्यांमधील प्रेम आणि आपुलकीचा गैरफायदा घेणाऱ्या स्वार्थी वृत्तीवर या कथेतून उपरोधिक भाष्य करण्यात आले. सूत्रसंचालन करताना पराग मगर म्हणाले, प्रत्येक विनोद हा समाजसुधारकाचाच असतो असे नाही, काही लेखक केवळ दैनंदिन जीवनातील तणतणावातून वाचकांना हसवण्याचा आणि आनंद देण्याचा प्रयत्न करतात. शुभदा फडणवीस यांनी आभार मानले.

दासावामध्ये विद्यार्थ्यांसमवेत वाचन प्रेरणा दिन

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई-रवींद्र मालुसरे



दादर सार्वजनिक वाचनालय आणि काशिनाथ धुरू ट्रस्टस हॉल यांच्या वतीने आज छबिलदास शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांच्या समवेत वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी दासावा प्रमुख कार्यवाह कामथे मॅडम यांच्यासह पदाधिकारी, पाठक मॅडम यांच्यासह कर्मचारीवर्ग आणि शेकडो विद्यार्थी हजर होते. दरवर्षी दासावाच्यावतीने १५ ऑक्टोबर हा दिवस भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ आणि मुलांचे लाडके व्यक्तिमत्त्व डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा हा जन्मदिवस आपण वाचन प्रेरणा दिन म्हणून शालेय विद्यार्थ्यांच्या समवेत साजरा करण्यात येतो.

मुलांना छान छान चित्रांची पुस्तके पाहायला आवडतात, परी, राजकुमार, जंगलातील प्राणी आणि शूरवीरांच्या गोष्टी वाचायला आवडतात. आज बालवाडी ते चौथी पर्यंतच्या वर्गातील मुलांनी स्टेजवर येऊन सुरेल आवाजात गाणी म्हणाले, गोष्टी सांगितल्या, आणि बोधकथेतून आपला विचार व्यक्त केला, अर्थात त्यात डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवनाचे सार आणि वाचनाचे महत्त्व त्यांच्या विचारामध्ये होते. भरगच्च हॉलमध्ये मुलांमध्ये धाडस वाखाणण्यासारखे होते.

याप्रसंगी प्रमुख सुनील वाकडे सर, कार्यक्रम समिती कार्यवाह सुमेधा डोंगरे,कार्याध्यक्ष मनोहर साळवी, सुरेश शिंदे, ग्रंथसमिती समिती प्रमुख राजन भालिंगे, कार्यवाह यतीन कामथे, प्राथमिक मुख्याध्यापिका रॉड्रिक्स ब्लॉंची, सूत्रसंचालन विलास कदम सर केले.

विसापूर टोल नाक्या जवळ बिबट्याचा ९ वर्षीय बालकावर हल्ला : झुडूपात टाळी वाजवून वाचवला जीव

दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे

नवरात्रोसह निमित्ताने चंद्रपूरच्या आराध्य दैवत माता महाकालीचे दर्शन घेण्यासाठी विविध जिल्ह्यातून व राज्यातून भाविक मोठ्या संख्येने येतात. अनेक नागरिक श्रद्धेपोटी पाठदळ प्रवास करून चंद्रपुरात दाखल होतात. हैदराबाद येथून बल्लारपूर येथील आपल्या आत्याकडे आलेल्या ९वर्षीय कार्तिक संजय जाधव हा बालकही आपल्या आत्या व इतर कुटुंबीय सोबत १७ ऑक्टोबर रोजी रात्री दहा वाजताच्या सुमारास बल्लारपूर वरून पायदळ निघाला होता. सर्वजण विसापूर टोल नाक्याजवळ पोहोचले असता अंधाराचा फायदा घेत दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक कार्तिकवर जीवघेणा हल्ला केला आणि त्याला आपल्या जबड्यात पकडून उचलून नेले.

नागरीकांचा पाठलाग आणि शोध मोहीम

अचानक घडलेल्या या थरारक प्रकरणाने परिसरात एकच हाहाकार उडाला उपस्थित नागरिकांनी तात्काळ धाव घेत बिबट्याचा माग काढत आरडा ओरडा सुरू केला काही



वेळातच घटनास्थळी वन विभाग आणि पोलीस जमू दाखल झाली. नागरिकांनी व प्रशासनाने मिळून आजूबाजूच्या परिसरात शोध मोहीम राबवली परंतु अंधारामुळे कार्तिकचा पत्ता लागला नाही

टाळीचा तो आवाज आणि जीवदान

घटना घडल्यानंतर तब्बल एक ते दोन तासानंतर घटनास्थळापासून काही अंतरावर असलेल्या एका दाट झुडपातून नागरिकांना टाळी वाजल्याचा आवाज आला सुरुवातीला कुणीतरी थट्टा किंवा गंमत करत असावी असे नागरिकांना वाटले. परंतु टाळीचा आवाज सलग येत राहिल्याने संशय आल्याने नागरिकांनी त्या आवाजाच्या दिशेने धाव घेतली. झुडपात जाऊन पाहिले असता कार्तिक रक्तबंबाळ अवस्थेत पडलेला आढळला. बिबट्याच्या हल्ल्यात त्याच्या गळ्याला व मानेला गंभीर जखम झाली होती ज्यामुळे त्याला बोलता येत नव्हते किंवा मोठ्याने ओरडताही येत नव्हते अशा अत्यंत कठीण व वेदनादायी परिस्थितीतही न घाबरता त्याने स्वतःचा प्राण वाचवण्यासाठी टाळी वाजवून नागरिकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

रक्तबंबाळ अवस्थेत सापडलेल्या कार्तिकला नागरिकांनी तात्काळ झुडपातून बाहेर काढून उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. सध्या त्याच्यावर वैद्यकीय उपचार सुरू असून या थरारक प्रसंगातही लहानग्या कार्तिकने दाखवलेले धैर्य आणि प्रसंगावधान संपूर्ण परिसरात कौतुकाचा विषय ठरले आहे. या घटनेमुळे विसापूर व बल्लारपूर परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून वन विभागाने तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांमधून होत आहे

शब्दवेली
साहित्य विशेष
दैनिक सिंहवाणी वृत्त
५ दिनांक : सोमवार, १९ ऑक्टोबर २०२६
Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com

सिद्धिदात्रीचा संदेश, भक्तीच्यावाटे समाज परिवर्तन

शशिकांत तोटे
दारव्हा, जि.यवतमाळ

आज नवरात्रोत्सवाचा शेवटचा दिवस. उत्सव संपलेला असेल परंतु, विचारांचा जागर आणि प्रबोधनाच्या दिवट्या अखंड तेवत असायला हव्या. आदिशक्ती जगजननी नवदुर्गेचे नवव्या दिवसाचे रुप असलेल्या सिद्धीदात्री देवीचा हाच संदेश. सिद्धिदात्री म्हणजे सिद्धी प्रदान करणारी देवी.धार्मिक मान्यतेनुसार,ती आपल्या भक्तांना ज्ञान, बुद्धी, शक्ती आणि यशाचे वरदान देते.मात्र, या देवीच्या रूपाकडे केवळ धार्मिक श्रद्धेच्या दृष्टिकोनातून न पाहता,त्यातील जीवनोपयोगी तत्त्वांचा आधुनिक सामाजिक परिस्थितीशी संबंध जोडणेही आवश्यक आहे.

सिद्धिदात्रीचे रूप म्हणजे मानवी क्षमतांची जाणीव, आत्मविश्वासाची जागृती आणि ध्येयप्राप्तीसाठी प्रयत्नशील राहण्याची प्रेरणा होय. माणसाच्या जीवनात यश मिळविण्यासाठी केवळ इच्छा असून चालत नाही, तर त्या इच्छेला प्रयत्नांची जोड द्यावी लागते. ध्येय निश्चित करणे,त्यासाठी सातत्याने परिश्रम करणे, अडचणींवर मात करणे आणि अपयशातून शिकत पुढे जाणे, ही यशाची खरी सूत्रे आहेत. त्यामुळे सिद्धिदात्रीच्या उपासनेतून केवळ इच्छापूर्तीची अपेक्षा न ठेवता स्वतःमधील सुप्त गुण विकसित करण्याचा संकल्प केला पाहिजे.

आजच्या स्पर्धात्मक युगात प्रत्येकाला यशाची घाई झाली आहे. कमी वेळेत अधिक मिळविण्याच्या प्रयत्नात अनेकदा माणूस संयम, प्रामाणिकपणा आणि नैतिक मूल्यांपासून दूर जातो. यश मिळविण्याची धडपड करताना त्याला माणुसकीचे भानही विसरायला होते. अशा परिस्थितीत सिद्धिदात्रीचे तत्त्वज्ञान आपल्याला यशाचा व्यापक अर्थ समजावून सांगते.केवळ पैसा,पद आणि प्रतिष्ठा मिळविणे म्हणजे यश नव्हे, तर स्वतःच्या कर्तृत्वाचा उपयोग कुटुंबाच्या, समाजाच्या आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी करणे, हीच खरी सिद्धी होय.

आत्मविश्वासातून आत्मनिर्भरतेकडेः

प्रत्येक व्यक्तीमध्ये काही ना काही विशेष क्षमता असतात.मात्र, परिस्थितीची प्रतिकूलता, आर्थिक अडचणी,अपुऱ्या संधी आणि आत्मविश्वासाचा अभावामुळे अनेकांना आपल्या क्षमतांचा विकास करता येत नाही. विशेषतःग्रामीण भागातील विद्यार्थी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील तरुण आणि वंचित घटकांमधील गुणवंत व्यक्तींना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते.

अशावेळी त्यांना केवळ सहानुभूती दाखविण्यापेक्षा योग्य मार्गदर्शन, शिक्षण आणि संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. एखाद्या गरजू विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्य देणे, शैक्षणिक व्यवस्थेची सुलभता,बेरोजगार तरुणाला कौशल्य प्रशिक्षण मिळवून देणे किंवा एखाद्या महिलेला स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करणे,हीसुद्धा सिद्धिदात्रीच्या तत्त्वज्ञानाची व्यावहारिक अभिव्यक्ती ठरू शकते. कारण दुसऱ्याच्या क्षमतेला योग्य संधी मिळवून देणे म्हणजे त्याच्या प्रगतीचा मार्ग खुला करणे होय. समाजातील प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी मिळाली, तर समाजाची सामूहिक शक्ती अधिक बळकट होईल.

सिद्धिदात्रीचे रूप स्त्रीशक्तीच्या सामर्थ्याची आणि कर्तृत्वाची जाणीव करून देते.भारतीय संस्कृतीत स्त्रीला आदिशक्तीचे प्रतीक मानले जाते. मात्र,देवीच्या रूपात स्त्रीची पूजा करणारा समाज प्रत्यक्ष जीवनात तिच्या स्वातंत्र्याला, निर्णयक्षमतेला आणि समान अधिकारांना कितपत मान्यता देतो,याचाही विचार करण्याची गरज आहे. आजची स्त्री शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, क्रीडा, साहित्य, कला आणि प्रशासन अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून ती आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहे. तरीही अनेक महिलांना कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळी, स्त्री-पुरुष असमानता, आर्थिक परावलंबित्व आणि सामाजिक रूढींचा सामना करावा लागतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे, त्यांच्या निर्णयस्वातंत्र्याचा आदर करणे आणि सुरक्षित वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. स्त्रीला देवी मानून तिची पूजा करण्याइतकेच तिला माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा अधिकार देणे महत्त्वाचे आहे. स्त्रीच्या सामर्थ्याला संधी देणे आणि तिच्या कर्तृत्वाचा सन्मान करणे, हीच सिद्धिदात्रीच्या उपासनेची खरी सामाजिक फलश्रुती ठरू शकते.



आजचे युग माहिती आणि तंत्रज्ञानाचे आहे. मोबाईल, इंटरनेट आणि समाजमाध्यमांमुळे जग जवळ आले आहे. ज्ञान मिळविण्याची साधने वाढली आहेत; मात्र त्याचबरोबर अफवा, दिशाभूल करणारी माहिती, एखाद्याला ट्रोलिंग करणे, अंधश्रद्धा आणि खोट्या प्रचाराचे प्रमाणही वाढत आहे. अशा परिस्थितीत माहितीच्या आधारे विचारपूर्वक निर्णय घेणे, सत्याची पडताळणी करणे आणि विवेकाचा वापर करणे आवश्यक आहे. श्रद्धा ही वैयक्तिक जीवनाचा महत्त्वाचा भाग असली,तरी ती विवेकाला विरोध करणारी नसावी. धार्मिक परंपरांचा आदर राखतानाच वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे,ही आधुनिक समाजाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेतील गुणांसाठी नव्हे, तर जीवन समजून घेण्यासाठी शिक्षण घेतले पाहिजे. तरुणांनी बदलत्या काळानुसार नवनवीन कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत. पालकांनी मुलांमध्ये प्रश्न विचारण्याची, स्वतंत्रपणे विचार करण्याची आणि स्वतःचे निर्णय जबाबदारीने घेण्याची क्षमता विकसित केली पाहिजे. ज्ञान माणसाला सक्षम बनवते, विवेक योग्य दिशा दाखवतो आणि कृती ध्येयापर्यंत पोहोचवते.या तिन्हींचा समन्वय साधला,तर व्यक्तीच्या जीवनात खऱ्या अर्थाने सिद्धी प्राप्त होऊ शकते.

सिद्धी केवळ वैयक्तिक नव्हे, सामाजिकही:

आपल्या समाजासमोर बेरोजगारी, व्यसनाधीनता, पर्यावरणाचा ऱ्हास,सामाजिक विषमता, असहिष्णुता आणि वाढती संवेदनहीनता यांसारखी अनेक आव्हाने आहेत. या समस्या केवळ शासनाच्या प्रयत्नांनी दूर होणार नाहीत. त्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. सिद्धिदात्रीच्या पूजनानिमित्त आपण आपल्या परिसरातील समस्यांचा विचार करू शकतो. व्यसनाधीन तरुणाला योग्य मार्गदर्शन करणे, गरजू विद्यार्थ्याला शिक्षणासाठी मदत करणे, वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन करणे, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे, रक्तदान शिबिरात सहभागी होणे आणि सामाजिक सलोखा टिकविण्यासाठी प्रयत्न करणे, अशा अनेक मार्गांनी समाजहित साधता येते.

समाजपरिवर्तनासाठी नेहमीच मोठ्या आंदोलनांची किंवा भव्य उपक्रमांची आवश्यकता नसते. अनेकदा एखाद्या व्यक्तीला दिलेला आधार, एखाद्या अन्यायाविरुद्ध उठवलेला आवाज किंवा एखाद्या गरजू कुटुंबाला केलेली मदत,यांतून परिवर्तनाची सुरुवात होते. आपल्या आसपासच्या दुःखाकडे डोळसपणे पाहणे, दुसऱ्याच्या अडचणी समजून घेणे आणि शक्य तेवढी मदत करणे, हीच सामाजिक संवेदनशीलता आहे. धार्मिक उत्सवांच्या माध्यमातून अशा मूल्यांचे संवर्धन झाले,तर भक्तीला समाजहिताची अर्थपूर्ण जोड मिळू शकते.

भक्तीला कृतीची जोड हवी:

नवरात्रोत्सवात देवीसमोर दीप प्रज्वलित केला जातो.आरती केली जाते, मंत्रोच्चार होतात आणि भक्तिभावाने प्रार्थना केली जाते.या सर्व धार्मिक परंपरांना मोठे सांस्कृतिक महत्त्व आहे. मात्र, या परंपरांमधून मिळणारी प्रेरणा आपल्या दैनंदिन आचरणात उतरविणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

देवीसमोर दिवा लावताना आपल्या मनातील अज्ञानाचा अंधार दूर करण्याचा संकल्प केला पाहिजे.आरती करताना द्वेष, मत्सर आणि अहंकार यांपासून दूर राहण्याची प्रेरणा घेतली पाहिजे. देवीकडे सुख-समृद्धीची प्रार्थना करताना समाजातील वंचित घटकांच्या जीवनातही आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. श्रद्धा माणसाला सद्विचार देते, सद्विचार योग्य कृतीची प्रेरणा देतात आणि योग्य कृती समाजात परिवर्तन घडवून आणते.त्यामुळे धार्मिकता आणि सामाजिक बांधिलकी यांचा समन्वय साधणे आवश्यक आहे.

सिद्धीचा खरा अर्थ ओळखूया:

नवदुर्गेचे नववे रूप असलेली माता सिद्धिदात्री आपल्याला ज्ञान, सामर्थ्य, आत्मविश्वास आणि ध्येयप्राप्तीची प्रेरणा देते. तिच्या रूपातील संदेश केवळ वैयक्तिक यशापुरता मर्यादित नसून, तो व्यापक सामाजिक उन्नतीशीही जोडलेला आहे. स्वतःच्या क्षमतांची ओळख करून घेणे, परिश्रमांवर विश्वास ठेवणे, अडचणींवर मात करणे आणि इतरांच्या प्रगतीसाठी हातभार लावणे, हीच या सदेशाची खरी व्याप्ती आहे.

आज गरज आहे ती केवळ देवीच्या जयघोषाची नव्हे, तर तिच्या तत्त्वज्ञानातून प्रेरणा घेऊन समाजातील नकारात्मक प्रवृत्तींविरुद्ध उभे राहण्याची. अंधश्रद्धेऐवजी विवेक, भेदभावाऐवजी समानता, निराशेऐवजी आत्मविश्वास आणि स्वार्थाऐवजी सामाजिक बांधिलकी स्वीकारण्याची.या नवरात्रोत्सवात माता सिद्धिदात्रीच्या चरणी नतमस्तक होताना आपण स्वतःमधील सुप्त गुण ओळखण्याचा, ज्ञानाची कास धरण्याचा, स्त्रीशक्तीचा सन्मान करण्याचा आणि समाजातील दुर्बल घटकांना सक्षम बनविण्याचा संकल्प करूया. कारण खऱ्या अर्थाने सिद्धी तीच, जी व्यक्तीला कर्तृत्ववान बनवते, विचारांना विवेकाची दिशा देते आणि समाजाला समता,बंधुता व मानवतेच्या मार्गावर घेऊन जाते. तूर्तास लेखनमालेच्या शब्द प्रवासास पूर्णविराम देऊया आणि विवेकनिष्ठ राहून देवींच्या नऊ प्रतिकातून मिळणाऱ्या सामाजीक संदेशाचे जीवनात आचरण करुया!

"जय माता दि"

मो. ९१३०८३५४५८

नवरात्र उत्सव विशेष : नववी कर्तृत्ववान स्त्री

'दिव्यांग असूनही जिद्दीने यश मिळवणारी स्त्री', संघर्षातून स्वाभिमानाकडे वाटचाल

– सौ. माधुरी धनोकार, अकोला

स्त्रीशक्तीचा जागर करताना आपण देवीच्या नऊ रूपांची पूजा करतो. मात्र, आपल्या आजूबाजूला अशा अनेक स्त्रिया आहेत, ज्या प्रतिकूल परिस्थितीशी लढत आपल्या कर्तृत्वाने समाजासमोर आदर्श निर्माण करतात. त्यापैकी एक महत्त्वाचे रूप म्हणजे दिव्यांग असूनही जिद्दीने यश मिळवणारी स्त्री. तिचा संघर्ष, तिची इच्छाशक्ती, तिचे धैर्य आणि आत्मविश्वास हे खऱ्या अर्थाने स्त्रीशक्तीचे दर्शन घडवतात.

दिव्यांगत्व म्हणजे आयुष्याचा शेवट नव्हे, तर वेगळ्या आव्हानांसह नव्याने जगण्याची सुरुवात होय. शारीरिक मर्यादा असल्या तरी मनातील स्वप्नांना मर्यादा नसतात. अनेकदा समाज दिव्यांग व्यक्तींकडे सहानुभूतीच्या नजरेने पाहतो; परंतु त्यांच्या क्षमतांकडे, बुद्धिमत्तेकडे आणि कर्तृत्वाकडे पाहण्याची गरज अधिक आहे. कारण संधी मिळाल्यास दिव्यांग महिला शिक्षण, क्रीडा, कला, उद्योग, साहित्य, विज्ञान आणि सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करू शकतात.

संघर्षातून घडते आत्मविश्वासाचे व्यक्तिमत्त्व

दिव्यांग महिलांच्या आयुष्यात अनेक अडचणी असतात. शिक्षणासाठी योग्य सुविधा मिळवणे, रोजगाराच्या संधी शोधणे, सार्वजनिक ठिकाणी सहज वावरता येणे आणि समाजात समानतेने वागणे यांसाठी त्यांना अनेकदा संघर्ष करावा लागतो. काही महिलांना कुटुंबाचा आधार मिळतो, तर काहींना स्वतःच्या जिद्दीवर आणि मेहनतीवर पुढे जावे लागते. प्रत्येक पावलावर येणाऱ्या अडचणींना सामोरे जात त्या स्वतःची वेगळी ओळख निर्माण करतात. त्यांच्या यशामागे केवळ नशीब नसते, तर सातत्यपूर्ण प्रयत्न, मेहनत, आत्मविश्वास आणि हार न मानण्याची वृत्ती असते. अपयश आले तरी पुन्हा उभे राहण्याची ताकद त्यांच्यात असते. इतरांसाठी जे अशक्य वाटते, ते शक्य करण्याची उमेद त्या आपल्या कृतीतून दाखवून देतात.



कर्तृत्वाच्या बळावर निर्माण केली स्वतंत्र ओळख

भारतातील अनेक दिव्यांग महिलांनी आपल्या कायार्तून जगाला प्रेरणा दिली आहे. अंधत्वावर मात करून प्रशासकीय सेवेत कार्य केलेल्या प्रांजल पाटील यांनी अनेकांसमोर आदर्श निर्माण केला. अरुणिमा सिन्हा यांनी कृत्रिम पायाच्या साहाय्याने माउंट एव्हरेस्ट सर करून जिद्दीची ताकद दाखवून दिली. पॅरा बॅडमिंटनपटू मानसी जोशी यांनी क्रीडा क्षेत्रात आपल्या कौशल्याने विशेष स्थान मिळवले.

या महिलांचे जीवन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते—यश मिळवण्यासाठी प्रत्येकाकडे समान क्षमता किंवा समान परिस्थिती असणे आवश्यक नाही; परंतु संधी, मेहनत आणि स्वतःवरील विश्वास यांची साथ मिळाली, तर अनेक अडथळ्यांवर मात करता येते.

दयेची नव्हे, समान संधींची गरज

दिव्यांग महिलांना सक्षम बनवण्यासाठी केवळ प्रेरणादायी भाषणे पुरेशी नाहीत. त्यांना दर्जेदार शिक्षण, सुलभ इमारती, सार्वजनिक वाहतुकीच्या सोयी, रोजगाराच्या संधी, आर्थिक स्वावलंबन आणि सुरक्षित वातावरण मिळणे आवश्यक आहे. कुटुंबाने त्यांच्यावर विश्वास ठेवावा, समाजाने त्यांना समानतेची वागणूक द्यावी आणि शासनाने उपलब्ध सुविधा प्रभावीपणे त्यांच्यापर्यंत पोहोचवाव्यात.

दिव्यांग महिलांना त्यांच्या क्षमतेनुसार संधी दिल्या, तर त्या केवळ स्वतःचे जीवन घडवत नाहीत, तर आपल्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या प्रगतीतही मोलाचे योगदान देतात. त्यांना मदतीची गरज असेल तेव्हा मदतीचा हात द्यावा; पण त्याचवेळी त्यांच्या स्वाभिमानाचा आणि स्वतंत्र निर्णयक्षमतेचा आदर करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

नवरात्रीतील नवदुर्गेचे प्रेरणादायी रूप

नवरात्र हा शक्ती, भक्ती आणि स्त्रीसन्मानाचा उत्सव आहे. नवदुर्गेच्या प्रत्येक रूपातून आपल्याला धैर्य, संयम, सामर्थ्य आणि संकटांवर मात करण्याची प्रेरणा मिळते. दिव्यांग स्त्रीच्या जीवनातही या गुणांचे दर्शन घडते. तिच्या वाट्याला आलेल्या आव्हानांना सामोरे जात ती स्वतःचे आयुष्य नव्याने घडवते. तिच्या चेहऱ्यावरील आत्मविश्वास, तिच्या प्रयत्नांतील सातत्य आणि तिच्या स्वप्नांसाठीची धडपड आपल्याला शिकवते की, माणसाचे मोठेपण त्याच्या शारीरिक क्षमतेत नसून त्याच्या विचारांत, कर्तृत्वात आणि जगण्याच्या दृष्टिकोनात असते.

आज गरज आहे ती प्रत्येक दिव्यांग स्त्रीला सन्मानाने जगण्याचा अधिकार देण्याची. तिच्या स्वप्नांना प्रोत्साहन देण्याची आणि तिच्या यशाचा अभिमान बाळगण्याची. कारण स्त्री सक्षम झाली, तर कुटुंब सक्षम होते आणि कुटुंब सक्षम झाले, तर समाजाची प्रगती अधिक वेगाने होते. दिव्यांग स्त्री ही सहानुभूतीची नव्हे, तर सन्मानाची आणि समान संधींची हक्कदार आहे. तिच्या जिद्दीला सलाम आणि तिच्या कर्तृत्वाला मानाचा मुजरा!

प्रेरणादायी चारोळी

पंख नसले तरी स्वप्नांना आभाळ देते, अडचणींच्या वाटेवर जिद्दीने चालते, दिव्यांग असली तरी कर्तृत्वाने उजळते, स्वाभिमानाच्या बळावर जग जिंकून दाखवते!

'संत सावता माळी: अभंग आणि विचार ग्रंथाची महाराष्ट्र शासनाच्या पुस्तक यादीत निवड

दै. सिंहवाणी वृत्त, सोलापूर

सुवर्णधन प्रकाशन सेवा संस्था सोलापूर यांनी प्रोफेसर सुवर्णा सुखदेव गुंड - चव्हाण लिखित प्रकाशित केलेल्या ' संत सावता माळी: अभंग आणि विचार' पुस्तकाची महाराष्ट्र शासनाच्या पुस्तक यादीत निवड करण्यात आली आहे. या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथमच संत सावता माळी यांच्या 'सकलसंतगाथा 'मध्ये १२ अभंगाचा उल्लेख केला आहे परंतु प्रो. सुवर्णा यांनी एकुण ३७ अभंगाचे संदर्भासह संशोधन केले आहे. त्याचप्रमाणे समीक्षण व संत सावता माळी यांची शिष्य परंपरा त्यांनी संशोधीत केली आहे.

संत सावता माळी यांच्या प्रत्येक पैलूंचा संशोधनात्मक रितीने प्रो.डॉ. सुवर्णा गुंड-चव्हाण या लेखिकेने परामर्श घेतला आहे. उदा. संत सावतीबांनी पर्यावरण, शेतीची पद्धती, आरोग्यासाठीचे विचार, औषध तयार करणं, मानसिक आरोग्य, सात्विक जीवन पद्धती, जीवनशैली, निष्ठा.. इत्यादी अनेक पैलूंवर सखोलपणे मांडणी केली आहे." संत सावता माळी मंदिराचे ट्रस्टी व विशेषतः संत सावता माळी यांचे चरीत्र लेखन करणारे प्राचार्य सावता घाडगे यांनी सौ. चव्हाण मँडम यांच्या लेखनशैलीचे कौतुक केले आहे.



या पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महामंडलेश्वर मनिषानंद महाराज पुरी, कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ, गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, प्रकाशक धनंजय चव्हाण या मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. या कार्यक्रमाला सोलापूर जिल्ह्यातील राजकीय, अध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

संत सावता माळी: अभंग आणि विचार' या पुस्तकाची दखल महाराष्ट्र शासनाकडून घेण्यात आली त्याबद्दल सर्व स्तरातून स्वागत होत आहे. यापूर्वी या पुस्तकास मानाच्या राज्यस्तरीय किसन महाराज सुडके जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. वाचनीय आणि संदर्भमूल्य असलेला हा ग्रंथ साकार होण्यासाठी सावता वसेकर महाराज, प्राचार्य सावता घाडगे, मुखपृष्ठकार चित्रकार सावता घाडगे, प्रकाशक धनंजय चव्हाण, प्राचार्य विजय गुंड, डायरेक्टर डॉ. संजय गुंड, प्रभु महाराज तुळशीकर, वसेकर महाराज माऊली, माऊली महाविद्यालय संस्थापक बळीराम काका साठे, संस्थाध्यक्ष बाबा साठे यांचे सहकार्य मौलिक आहे. कुलगुरू महोदय प्रोफेसर प्रकाश महानवर, प्रोव्हीसी प्रोफेसर लक्ष्मीकांत दामा, नेवासा ट्रस्टी अध्यक्ष माऊली महाराज, ग्रंथमित्र गुलाबराव पाटील, ग्रंथमित्र आराध्ये सर, ग्रंथमित्र कुंडलिकराव मोरे, डॉ.प्रदीप औजेकर, महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष प्रोफेसर प्रदीपजी खेडकर, उपाध्यक्ष मसप दत्ता आण्णा सुरवसे, कार्याध्यक्ष मसप किशोरीजी चंडक,संत सावता माळी मंदिराचे विश्वस्त व सर्व स्तरांतील मान्यवर व वाचकांनी अभिनंदन केले आहे.



वाच रे पोरा

वाच रे पोरा एखादं पुस्तक
वाच रे पोरा वाच!

वाचून आनंद मिळतो रे,
विचार शाबूत होती रे,
दूर करी अज्ञान,
जीवाचे समाधान,
उघड पुस्तकं वाच!
वाच रे पोरा...

पठणाने वाणी उन्नत रे,
अफाट कल्पनाशक्ती रे,
असो आधुनिक युग,
ठेव वाचनाची भूक,
घेऊन पुस्तकं वाच!
वाच रे पोरा...

ग्रंथ प्रदर्शनात जाशी रे,
वाचनालयात वेशी रे,
वाचनाची गोडी,
आयुष्य घडवी,
जाऊन पुस्तकं वाच!
वाच रे पोरा...

– प्रा. डॉ. विलास डोईफोडे
सावनेर, जि. नागपूर
मो. ९११२८५७२९९

थोडक्यात

चाणक्यपुरम येथे नवरात्रोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल!

नृत्य स्पर्धा, नवदुर्गा जागरण, गरबा, रक्तदान शिबिरासह विविध उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, ३०महिला व पुरुषांनी केले ऐच्छिक रक्तदान, महिला सशक्तीकरणावर भर



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शिव पंचायतन मंदिर, चाणक्यपुरम, हुडकेश्वर रोड, नागपूर येथे यंदा २२ व्या वर्षी आयोजित नवरात्रोत्सव धार्मिक उत्साह, भक्तिमय वातावरण आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात येत आहे. नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांना चाणक्यपुरमसह परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.नवरात्रोत्सवात काली माता सामूहिक नृत्य, नवदुर्गा जागरण, गोंधळ, गरबा, रासरंग नृत्य स्पर्धा आदी धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्सवाची रंगत वाढविली आहे. यासोबतच फॅन्सी ड्रेस स्पर्धा, एकांकिका तसेच लहान मुलांसाठी चित्रकला आणि विविध स्पर्धा यांसारख्या उपक्रमांतून बालकांना व युवकांना आपले कलागुण सादर करण्याची संधी मिळत आहे. सामाजिक बांधिलकी जपत नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी ३० महिला व पुरुषांनी ऐच्छिक रक्तदान केले. धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक जाणीव यांचा सुंदर संगम या उत्सवातून अनुभवायला मिळत आहे.

उत्सवाच्या समारोपानिमित्त दसरा स्नेहमिलन, आनंद मेळावा, बक्षीस वितरण आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमांमुळे परिसरातील नागरिकांना एकत्र येण्याची आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करण्याची संधी मिळत आहे. नवरात्रोत्सव यशस्वी करण्यासाठी आयोजन समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून महिला सशक्तीकरणावर भर दिल्या जात आहे. नागरिकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल आयोजन समितीचे जितेंद्र मुळे यांनी सर्व भाविक, नागरिक, सहकारी आणि सहकार्य करणाऱ्या व्यक्तींचे आभार व्यक्त केले. नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरेचे जतन करण्यासोबतच सामाजिक एकोपा, सांस्कृतिक अभिव्यक्ती, महिला सशक्तिकरण आणि सेवाभावाची भावना अधिक दृढ होत असल्याचे चित्र चाणक्यपुरम येथे पाहायला मिळत आहे.

चारगाव-बच्छेरा मार्गावर भीषण अपघात; परसोडी येथील स्कूटी चालकाचा उपचारादरम्यान मृत्यू

दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी

पारशिवनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत बच्छेरा ते चारगाव मार्गावरील बिअरबार जवळ १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी झालेल्या भीषण



रस्ते अपघातात एका ३० वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. नितीन प्रभाकर बेदरे (वय ३०, रा. परसोडी) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नितीन बेदरे हे चारगाव येथून आपल्या स्कूटी क्रमांक एम एच ४० ए वि १९०८ ने परसोडी येथील घराकडे जात होते. दरम्यान, बच्छेरा ते चारगाव मार्गावरील एका बारजवळ त्यांच्या वाहनाला अपघात झाला. या अपघातात ते गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांना तात्काळ १०८ अँम्बुलन्सद्वारे नवेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले.

मात्र, अपघाताच गंभीर इजा झाल्याने प्रचंड रक्तस्राव झाला होता. परिणामी, प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारा दरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेमुळे परसोडी गावावर शोककळा पसरली असून पारशिवनी पोलीस ठाण्यात पोलिस निरिक्षक किशोर शेरकी च्या मार्गदर्शनात याप्रकरणी नोंद करण्यात आली आहे. अपघाताचे नेमके कारण काय होते, याचा पुढील तपास पारशिवनी पोलीस करत आहेत.

अरोली येथील नवरात्र उत्सव सुरू असलेल्या चैतन्येश्वर शिवपार्वती मंदिरात राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांची भेट

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू: मौदा

दरवर्षीप्रमाणे यंदाही अरोली येथील चैतन्येश्वर शिवपार्वती मंदिरात घटस्थापना करून विविध धार्मिक व सांस्कृतिक



कार्यक्रमाचे आयोजन करून नवरात्र उत्सव साजरा करण्यात येत आहे. शनिवार (ता. १७ ऑक्टोबर) ला राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी या मंदिरात भेट देऊन मंदिर परिसरात सुरू असलेल्या विकास कामांची पाहणी करून अरोलीच्या कोणत्याही विकास कामाला निधीची कमतरता पडू देणार नाही, अरोलीच्या विकास कामात भरघोस निधी देण्यात येईल अशी ग्वाही जयस्वाल यांनी याप्रसंगी उपस्थित ग्रामस्थांना दिली.

याप्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख प्रशांत भुरे, अरोली सरपंचा रोशनी भुरे, तंटामुक्त अध्यक्ष कैलास समरीत, मंदिर कमिटीचे पदाधिकारी नाना गजबे, सदानंद फटिंग , भाविक महिला, पुरुष मंडळी सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रोजगार आणि शिक्षण क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी काँग्रेसला साथ द्या : डॉ. नितीन राऊत

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

संविधान वाचवायचे असेल, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराचा समूळ नायनाट करायचा असेल आणि बेरोजगार हातांना काम द्यायचे असेल, तर काँग्रेस-महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजित गोविंदराव वंजारी यांच्या नावापुढे १ हा पसंतीक्रम लिहून त्यांना प्रचंड बहुमताने निवडून द्या, असे आवाहन माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केले.



नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजित वंजारी यांच्या प्रचारार्थ बजाजनगर येथील एनराइज बाय सयाजी येथे आयोजित सभेत ते बोलत होते. डॉ. आंबेडकर हेल्थ ऑर्गनायझेशन, डॉ. आंबेडकर इंजिनिअरिंग असोसिएशन, फागा-फाटा, डॉ. आंबेडकर टीचर्स असोसिएशन, डॉ. आंबेडकर ॲग्रीकोज असोसिएशन, मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेड यांच्या वतीने या सभेचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. राऊत म्हणाले की, शिक्षण हे समाजाच्या प्रगतीचे प्रभावी माध्यम असून, शिक्षण क्षेत्रातील अनियमितता आणि भ्रष्टाचारामुळे विद्यार्थ्यांसह शिक्षक व कर्मचाऱ्यांनाही अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. सुशिक्षित तरुणांना रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या प्रश्नांना न्याय देणे आणि शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता निर्माण करणे आवश्यक आहे. पदवीधर मतदारसंघातून निवडून जाणारा प्रतिनिधी हा केवळ पदवीधरांचा नव्हे, तर शिक्षण, रोजगार आणि सामाजिक न्यायाशी संबंधित प्रश्नांचा प्रभावी आवाज असला पाहिजे. त्यामुळे या निवडणुकीत संविधानिक मूल्यांचे संरक्षण आणि लोकशाही बळकट करण्यासाठी काँग्रेस-महाविकास आघाडीच्या उमेदवाराला पाठिंबा द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

या सभेला डॉ. त्रिलोक हजारे, अनिल नगराळे, प्रदीप नगरारे, सतीश यादव, दिलीप खोडके, जयंत जांभुळकर, ॲड. स्मिता टाकसांडे, डॉ. शंकर खोब्रागडे, डॉ. पुरण मेश्राम, तक्षशिला वाघधरे, अर्चना खोब्रागडे, अमन कांबळे, प्रीतम बुलकुंदे, संध्या भड, लांजेवार, सच्चिदानंद दरंडे, सुरेश पाटील आणि रोशन देवतळे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सभेत अभिजित वंजारी यांच्या प्रचाराला गती देण्यासोबतच पदवीधर मतदारांशी संपर्क वाढविणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि निवडणुकीत महाविकास आघाडीच्या बाजूने मतदान करण्यासाठी जनजागृती करण्यावर भर देण्यात आला.

दीक्षाभूमीवर धम्मदीक्षेचा सोहळा

पहिल्याच दिवशी तीन हजार अनुयायांनी स्वीकारला बुद्धधम्म, देशाच्या विविध भागांतून अनुयायांचा ओघ, श्रामणेरांचाही धम्मदीक्षेत सहभाग



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक धम्मक्रांतीची साक्ष देणाऱ्या पवित्र दीक्षाभूमीवर रविवारी पुन्हा एकदा 'बुद्धं शरणं गच्छामि'चा मंगलघोष निनादला. देशाच्या विविध भागांतून आलेल्या हजारो उपासक-उपासिका आणि बौद्ध अनुयायांनी तथागत गौतम बुद्धांचा धम्म स्वीकारला. तीन दिवस चालणाऱ्या या सोहळ्याच्या पहिल्याच दिवशी सायंकाळपर्यंत सुमारे तीन हजार अनुयायांनी धम्मदीक्षा घेतली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी आणि अखिल भारतीय भिक्खू संघाच्या संयुक्त सहकार्याने रविवारपासून तीन दिवसीय धम्मदीक्षा सोहळ्याला प्रारंभ झाला. दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेनानायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांनी सकाळी बुद्धवंदना घेऊन सोहळ्याची सुरुवात केली. डोक्यावर निळी टोपी, हातात पंचशील ध्वज आणि मनात तथागतांचा समता-करुणेचा संदेश घेऊन सकाळपासूनच अनुयायांची पावले दीक्षाभूमीकडे वळली. विविध राज्यांतून आलेल्या समूहांमुळे परिसरात धम्ममय वातावरण निर्माण झाले होते. भिक्खू संघाकडून दिवसभर धम्मदीक्षा देण्यात आली. यात त्रिशरण पंचशील आणि २२ प्रतिज्ञांचा समावेश होता. धम्मदीक्षा घेणाऱ्यात श्रामणेरांचाही समावेश होता. सायंकाळी सात वाजेपर्यंत सुमारे तीन हजार अनुयायांनी धम्माचा स्वीकार केला. त्यानंतर आवश्यक नोंदणी करून दीक्षार्थींना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

सोहळ्यात भंते नागसेन, भंते प्रज्ञाबोधी, भंते धम्मविजय, भंते महानागा, भंते कुमारकश्यप, भंते धम्मप्रकाश, भंते नागप्रकाश, भंते नागानंद, भंते धम्मपाल, भंते बुद्धदीप, भंते कुशीनागा आणि भंते अनुत्तरबोधी यांच्यासह भिक्खू संघातील मान्यवर सहभागी झाले.

सोमवार-मंगळवारी संख्या आणखी वाढण्याची शक्यता

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या मुख्य सोहळ्यासाठी दीक्षाभूमीकडे येणाऱ्या जनसागराचा ओघ वाढत असल्याने सोमवार आणि मंगळवारी धम्मदीक्षा घेणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता भदंत ससाई यांनी व्यक्त केली.

नवरात्रोत्सवासाठी १८ ऑक्टोबर रोजी ध्वनीक्षेपकाला मध्यरात्रीपर्यंत परवानगी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दिनांक १८ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरण्यास सूट देण्यात आली आहे. परंतू या सुट काळात परवानगी मर्यादेच्या बाहेर ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धकाचा वापर करता येणार नाही. पर्यावरण विभागाच्या दिनांक २२ ऑगस्ट २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये पोलीस विभागाशी सल्लामसलत नंतर सन २०२६ करीता वर्षभरात १५ दिवसांपैकी १४ दिवसांकरिता सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरास परवानगी देण्यात आली आहे. उर्वरित १ दिवसापैकी नवरात्रोत्सवासाठी दिनांक १८ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक वापरास परवानगी देण्यात येत आहे. ही परवानगी शासनाने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात आली आहे.

चाचेर शाळेच्या प्रांगणात गरब्याचा जल्लोष! चिमुकल्यांच्या दांडियाने रंगले वातावरण

पारंपरिक वेशभूषा, रंगीबेरंगी पोशाख आणि दांडियाच्या तालावर विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

पी.एम.श्री. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चाचेर येथे गरबा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात पार पडला. पारंपरिक वेशभूषेतील चिमुकल्या विद्यार्थिनी, हातात रंगीबेरंगी दांडिया आणि तालबद्ध नृत्याच्या सुंदर आविष्कारामुळे शाळेचे प्रांगण गरब्याच्या रंगात न्हाऊन निघाले. भारतीय संस्कृती आणि पारंपरिक लोककलेचे जतन व्हावे, विद्यार्थ्यांना आपल्या सांस्कृतिक परंपरांची ओळख व्हावी, तसेच त्यांच्या अंगभूत कलागुणांना व्यासपीठ मिळावे, या दृष्टीने अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. गरब्याच्या तालावर थिरकणाऱ्या विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावरील आनंद, उत्साह आणि आत्मविश्वास उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होता.

रंगीबेरंगी पारंपरिक पोशाख, आकर्षक दांडिया आणि नृत्यातील एकरूपता यामुळे संपूर्ण वातावरण उत्साहाने भारावून गेले. विद्यार्थिनींनी आपल्या नृत्यकौशल्यातून भारतीय संस्कृतीचे सुंदर दर्शन घडविले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आनंददायी अनुभव मिळण्याबरोबरच सांघिक भावना, आत्मविश्वास आणि सांस्कृतिक जाणीव वृद्धिंगत होण्यास मदत झाली. शाळेतील शैक्षणिक उपक्रमांसोबतच सांस्कृतिक कार्यक्रमांनाही महत्त्व दिले जात असल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत आहे. चिमुकल्यांच्या उत्साही सहभागामुळे हा गरबा कार्यक्रम संस्मरणीय ठरला. शिक्षणासोबत संस्कार, संस्कृती आणि कलागुणांना प्रोत्साहन; हाच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया! असल्याचे मत यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जीवन सहारे व मुख्याध्यापक अनिल गडपायले यांनी व्यक्त केले.

रंगताली गरबा महोत्सवाची नेत्रदीपक आतषबाजीत सांगता : कुलदीप रविदास गरबा किंग, तर साहिबा ओसवाल गरबा क्वीन

दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे

काँग्रेस पक्षाच्या माजी राज्य महिला सचिव तथा ज्येष्ठ नेत्या डॉ. राजनीताई हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नेतृत्वात आयोजित रंगताली गरबा महोत्सवाची शुक्रवारी रात्री नेत्रदीपक आतषबाजीने उत्साहपूर्ण सांगता झाली. या महोत्सवात विविध गटांतील स्पर्धकांनी आपल्या नृत्यकौशल्याने उपस्थितांची मने जिंकली. गरब्याच्या तालावर रंगलेल्या या सोहळ्यात विजेत्यांची घोषणा करण्यात आली. डॉ. राजनीताई हजारे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करून गौरविण्यात आले. या महोत्सवात कुलदीप रविदास याला गरबा किंग, तर साहिबा ओसवाल हिला गरबा क्वीन हा किताब मिळाला.



समूह नृत्य प्रकारात स्पॅप डान्स ग्रुपने प्रथम पारितोषिक पटकावले. लहान मुलांच्या गटात पारुल नार्वे, महिलांच्या गटात वैशाली ठाकरे, सामान्य गटात गणेश मुकके, मुलींच्या एकल नृत्य गटात वैदेही आणि मुलांच्या गटात अभय पिंपळे यांनी प्रथम क्रमांक मिळविला. जोडप्यांच्या गटात सार्थक चौधरी आणि लावण्या पोटें यांनी प्रथम पारितोषिक पटकावले.बक्षीस वितरण समारंभाला बल्लारपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा डॉ. अल्का वाढई, सीडीसीसी बँकेचे संचालक डॉ. अनिल वाढई, शिवसेनेचे नेते घनश्याम मूलचंदानी, नगर परिषदेचे उपाध्यक्ष देवेंद्र आर्य, गटनेते अब्दुल करीम, नगरसेवक इस्माईल ढाकवाला, नगरसेवक भास्कर माकोडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. रंगताली गरबा महोत्सवाच्या माध्यमातून शहरातील गरबाप्रेमींना आपली कला सादर करण्याची संधी मिळाली.

लहान मुलांपासून ते महिला आणि युवकांपर्यंत विविध वयोगटांतील स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. संपूर्ण महोत्सवात उत्साह, आनंद आणि गरब्याचा जल्लोष पाहायला मिळाला. अखेर नेत्रदीपक आतषबाजीने या महोत्सवाची दिमाखदार सांगता झाली.

वडिलांचे छत्र हरपले, तरी श्रद्धाने सुवर्णपदकाला गवसणी घातली

जलालखेड्याच्या कन्या श्रद्धा कपलेचे सुवर्ण यश, दु:खावर मात करत मिळविले यश

दै.सिंहवाणी वृत्त, नरखेड

आयुष्यात कितीही मोठे संकट आले, तरी जिद्द, मेहनत आणि ध्येयप्राप्ति निष्ठा असेल तर यशाचा मार्ग गाठता येतो, याची प्रचिती नरखेड तालुक्यातील जलालखेडा येथील कु. श्रद्धा मनोज कपले हिने दिली आहे. वडिलांचे छत्र हरपल्याचे दु:ख पचवून तिने मास्टर्स ऑफ पब्लिक हेल्थ या पदव्युत्तर अभ्यासक्रमात उत्कृष्ट गुण मिळवत सुवर्णपदक पटकावले. तिच्या या यशामुळे कपले कुटुंबासह संपूर्ण गावाची मान उंचावली आहे.



श्रद्धा ने अदानी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च येथून २०२३ ते २०२५ या कालावधीत मास्टर्स ऑफ पब्लिक हेल्थ या अभ्यासक्रम पूर्ण केला. तिच्या शैक्षणिक गुणवत्तेची दखल घेत १७ ऑक्टोबर रोजी आयोजित दीक्षांत समारंभात तिला सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. संस्थेच्या कुलपती प्रीती गौतम अदानी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तिला हा सन्मान देण्यात आला.

श्रद्धाच्या यशामागे संघर्षाची वेदनादायी पार्श्वभूमी आहे. सुमारे वर्षभरापूर्वी तिचे वडील मनोज कपले यांचे कुलरमधून विजेचा धक्का लागल्याने निधन झाले. कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला. अशा कठीण प्रसंगात वडिलांचे छत्र हरपल्यानंतरही श्रद्धाने शिक्षणातील आपले ध्येय सोडले नाही. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत तिने अभ्यासात सातत्य राखले आणि आपल्या गुणवत्तेच्या बळावर सुवर्णपदक मिळवून वडिलांच्या आठवणींना अभिमानास्पद उजाळा दिला.

सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून सुवर्णपदक मिळविणे ही तिच्या मेहनतीची आणि शैक्षणिक गुणवत्तेची पावती आहे. तिच्या या यशातून संकटांवर मात करून ध्येय गाठण्याची प्रेरणा इतर विद्यार्थ्यांनाही मिळत आहे. विशेषतः कठीण कौटुंबिक परिस्थितीतही शिक्षणाची वाट न सोडता यश संपादन करता येते, हे श्रद्धाने आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.

श्रद्धाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तिचे नातेवाईक, मित्रपरिवार आणि गावातील नागरिकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. वडिलांच्या निधनाचे दु:ख मनात असतानाही तिने मिळविलेल्या या यशामुळे तिच्या कुटुंबाच्या संघर्षाला आणि जिद्दीला नवी ओळख मिळाली आहे. वडिलांचे छत्र हरपले, पण जिद्दीची साथ सोडली नाही; श्रद्धाच्या सुवर्णयशाने जलालखेड्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

थोडक्यात

इंदोरा येथील दसरा मैदानात मंगळवारला भव्य दसरा महोत्सव

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

अरोली - कोदामेंढी जि प क्षेत्रातील गट ग्रामपंचायत इंदोरा अंतर्गत येत असलेल्या इंदोरा व इंद्रपुरी येथील ग्रामस्थांकडून दरवर्षीप्रमाणे यंदाही मंगळवार (ता. २० ऑक्टोबर)ला सायं. ४ ते रात्री १० वाजेपर्यंत इंदोरा येथील दसरा मैदानात भव्य दसरा महोत्सव चे आयोजन केले आहे. याप्रसंगी भव्य दुगार्मांता विसर्जन मिरवणूक, आकर्षक धार्मिक व सांस्कृतिक झाकी, भव्य रावण दहन व दसरा उत्सव सोहळा हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण राहणार आहे. या भव्य दसरा महोत्सवाचे लाभ घेण्याचे आव्हान इंदोरा व इंद्रपुरी येथील समस्त ग्रामवासियांनी गावातील, परिसरातील, तालुक्यातील, जिल्ह्यातील, राज्यातील व देशातील नागरिकांना केले आहे.

रामेश्वर साठवणे यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

खात - रेवारा जि.प क्षेत्र अंतर्गत येत असलेल्या मांगली (तेली) येथील माजी सरपंच रामेश्वर साठवणे (६३)यांचे आज रविवार (ता. १८ ऑक्टोबर)ला सायं. ५:३० वाजता दरम्यान दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर उद्या सोमवार (ता. १९ ऑक्टोबर) ला सकाळी १० वाजता दरम्यान स्थानिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून,दोन मुली,जावई, नातवंडे व बराच मोठा आप्तपरिवार आहे.




भिवापूर कनिष्ठ महाविद्यालयाची जिल्हास्तरीय स्पर्धेत पदकांची कमाई



दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्यावतीने १६ व १७ ऑक्टोबर रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या ॲथलेटिक्स ट्रॅकवर आयोजित जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत भिवापूर कनिष्ठ महाविद्यालयाच्या १९ वर्षाखालील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. महाविद्यालयाच्या संघाने दोन सुवर्ण, एक रौप्य आणि तीन कांस्यपदके मिळवत स्पर्धेत आपली छाप पाडली. या स्पर्धेत आदर्श तळेकर याने १०० मीटर धावण्याची शर्यत ११.२० सेकंदांत पूर्ण करत सुवर्णपदक पटकावले. यश नखाते याने ५००० मीटर चालण्याच्या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. महाविद्यालयाच्या ४ बाय ४०० मीटर रिले संघाने रौप्यपदक मिळवले. या संघात प्रणय माकडी, अमेय ब्राम्हणे, यश नखाते आणि आदर्श तळेकर यांचा समावेश होता. याशिवाय, ४०० मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत यश नखाते याने कांस्यपदक मिळवले. मुलींच्या २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत अनमोल ठाकूर हिने तृतीय क्रमांक पटकावला, तर मुलांच्या लांब उडीमध्ये अमेय ब्राम्हणे याने कांस्यपदकाची कमाई केली. मुलांच्या २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत आदर्श तळेकर चौथ्या क्रमांकावर राहिला. तसेच ४ बाय १०० मीटर रिले शर्यतीत महाविद्यालयाच्या संघाला चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेतील यशस्वी खेळाडू आगामी नागपूर विभागीय मैदानी स्पर्धेत नागपूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जॉर्ज, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी न्यू तोतलाडोह येथील नवदुर्गा उत्सव निमित्त गरबा कार्यक्रमाला भेट देऊन घेतले देवीचे दर्शन



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त रामटेक तालुक्यात ठिकठिकाणी धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. याच पार्श्वभूमीवर, राज्याचे राज्यमंत्री तथा आमदार ॲड. आशिष जयस्वाल यांनी रामटेक तालुक्यातील सार्वजनिक नवदुर्गा उत्सव मंडळ आणि न्यू तोतलाडोह येथील गरबा कार्यक्रमाला विशेष भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी आदिमायेच्या चरणी लीन होऊन देवीचे दर्शन घेतले आणि परिसराच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. न्यू तोतलाडोह येथे आगमन होताच उत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी आणि स्थानिक नागरिकांनी राज्यमंत्र्यांचे स्वागत केले. नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वावर आयोजित करण्यात आलेल्या या गरबा व दांडिया कार्यक्रमांमध्ये नागरिकांचा, विशेषतः महिला व तरुणांचा मोठा उत्साह पाहायला मिळाला.

याप्रसंगी बोलताना राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सर्वांना शारदीय नवरात्रोत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. तसेच, रामटेक परिसरातील ही सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरा अखंडपणे जपल्याबद्दल दोन्ही मंडळांच्या कार्यकर्त्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाला ग्राम पंचायत वडंबाचे सरपंच मुकेश दुबे, शिवसेना रामटेक तालुका प्रमुख विवेक तुरक, माजी पंचायत समिती रामटेक सभापती संजय नेवारे, चंद्रकांत कोडवते, ग्राम सदस्य मीरा राठोड,विशाल वरठी,आशिष राठोड, जागेश वाघाडे, बाळकृष्ण उचिबगले, रामूबाबा कवरे, असलम पठाण, विलास कुंभरे सह मंडळाचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि परिसरातील भाविक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दीक्षाभूमीवरील मनपाच्या नियंत्रण कक्षाचे लोकार्पण

क्यूआरकोड स्कॅन करताच मिळणार संपूर्ण माहिती



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त पवित्र दीक्षाभूमी वर येणाऱ्या लाखो अनुयायांच्या सुविधेसाठी नागपूर महानगर पालिकातर्फे साहित्यभूषण अण्णाभाऊ साठे स्मारकाजवळ मनपा नियंत्रण कक्ष उभारण्यात आले आहे. या नियंत्रण कक्षाचे मान्यवरांच्या हस्ते रविवारी (ता: १८) लोकार्पण करण्यात आले. तसेच मान्यवरांच्या हस्ते मनपाच्या सोयी सुविधांची माहिती देणाऱ्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. विशेष म्हणजे, यंदा डिजिटल स्वरूपात माहिती पुस्तक उपलब्ध करून देण्यात आले आहे. मदत कक्षात लावण्यात आलेल्या क्यू आर कोड स्कॅन करताच मिळणार संपूर्ण माहिती मोबाईल फोन वर उपलब्ध होणार आहे.

नियंत्रण कक्षाच्या लोकार्पण प्रसंगी उपमहापौर श्रीमती लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, मनपा आयुक्त डॉ विपीन, सह पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, मनपाच्या झोन सभापती तारा यादव, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम,मुख्य अभियंता लीना उपाध्ये, अधीक्षक अभियंता विजय गुरुवक्षाणी, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ.गजेंद्र महल्ले, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, सहायक आयुक्त धनंजय जाधव, प्रमोद वानखेडे, कार्यकारी अभियंता श्रीकांत वाईकर, राजेंद्र राठोड, उपअभियंता राजीव गौतम, झोनल वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनील कांबळे, उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे, कर विभागाचे जितेंद्र तोमर यांच्यासह मनपाचे अधिकारी, कर्मचारी, स्वच्छतादूत प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी तर आभार अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम यांनी व्यक्त केले.

यावर्षी ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाकरीता दीक्षाभूमी येथे येणाऱ्या अनुयायांकरीता नागपूर महानगरपालिकेद्वारा दिनांक १८ ऑक्टोबर रोजी सांयकाळ पासून ते गुरूवार २२ ऑक्टोबर सायंकाळ पर्यंत मुलभुत व अत्यावश्यक सोयी सुविधा पुरविल्या जाणार आहेत. दीक्षाभूमी परिसराच्या ठिकाणी व सभोवताल (दीक्षाभूमी ते लॉ कॉलेज परिसर, डॉ. पंजाबराव देशमुख विद्यापिठ परिसर, आय. टी. आय. परिसर, माता कचेरी परिसर, जेल परिसर) येथे एकूण १०५५ शौचालयाच्या सिटस् तसेच अंबाझरी तलावाच्या पायथ्याशी १८० शौचालयाच्या सिट्स व बेझनबाग व उंटखाना मैदानात ४० शौचालयाच्या सिटस् अशा एकूण १२८५ शौचालयाच्या सिट्स उपलब्ध करून दिलेल्या आहेत. यात महिला व पुरूषांकीरता वेगवेगळे १४० स्नानगृहाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. हाथ, चेहरा व पाय धुण्याकरीता ५० वॉश बेसिंग ची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. पिण्याची पाण्याची व्यवस्थेकरीता रस्त्यावर १२० नळांची व्यवस्था तसेच प्रत्येक निवारा केंद्रावर पिण्याची पाण्याची व्यवस्था केलेली आहे. अतिरिक्त प्रकाश व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच नागपूर महानगरपालिकेद्वारे ४४ स्थायी सीसीटीव्ही कॅमेरे व १६ अस्थायी सीसीटीव्ही कॅमेरे उपलब्ध करून सुरक्षा व्यवस्थेकरीता पोलिस विभागास मदत करण्यात येत आहे. परिवहन व्यवस्थेकरीता काचीपुरा चौकात म.न.पा. परिवहन विभागाचे नियंत्रण कक्ष तयार करून उक्त नियंत्रण कक्षातून अनुयायांकरीता प्रवासाकरीता १६० आपली बससेच्या ई बसेसची व्यवस्था केलेली आहे. स्वास्थ व्यवस्थेकरीता मनपाद्वारे दीक्षाभूमी परिसराच्या चारही बाजूच्या चौकामध्ये आरोग्य सहाय्यता केंद्र, रुग्णवाहिका तैनात केलेले आहे. आपत्ती व्यवस्थापने अंतर्गत अग्निशमन विभागाचे अग्निशमन दल तैनात करण्यात आलेले आहे.

आकस्मित व्यवस्था

पावसाची शक्यता असल्याने दीक्षाभूमी परिसराच्या आजुबाजुच्या क्षेत्रातील नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या ८ शाळा, इमारती तसेच इतर खाजगी संस्थेच्या जवळपास ४० इमारती अधिगृहन करून ठेवण्यात आलेल्या आहेत. जेणेकरून पावसाच्या स्थितीत अनुयायांची उक्त इमारतीमध्ये राहणेची सोय करण्यात येईल.या सर्व व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणेकरीता नागपूर महानगरपालिकेचे एक स्वतंत्र नियंत्रण कक्ष तयार करण्यात आलेले आहे.

नियंत्रण कक्ष दूरध्वनी क्रमांक

१) दीक्षाभूमी अग्निशमन व आपत्कालीन नियंत्रण कक्ष दूरध्वनी क्रमांक -0712-2220030

२) नागपूर महानगरपालिका नियंत्रण कक्ष अण्णाभाऊ साठे चौक - 0712-2220029

गुरुदेव सेवा मंडळाच्या ग्रामस्वच्छता अभियानाचा ७० गावांत विस्तार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

गुरुदेव सेवा मंडळ, पेन्शननगर, नागपूर यांच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा प्रसार आणि ग्रामविकासाचा संकल्प घेऊन राबविण्यात येत असलेल्या ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत रविवार, १८ ऑक्टोबर रोजी कामठी तालुक्यातील लोणारा गावात रामधून काढून ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या अभियानांतर्गत लोणारा हे नागपूर जिल्ह्यातील ७० वे गाव ठरले आहे. गावाच्या स्वच्छतेसोबतच सामाजिक प्रबोधन, पर्यावरण संवर्धन आणि सामुदायिक प्रार्थनेच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचा मंडळाचा प्रयत्न या उपक्रमातून अधोरेखित झाला. गुरुदेव सेवा मंडळ, पेन्शननगर, नागपूर यांच्यावतीने दर महिन्यातील एक रविवार ग्रामस्वच्छता आणि सामाजिक प्रबोधनासाठी राखून ठेवण्यात येतो. या दिवशी मंडळाचे पदाधिकारी व सदस्य संबंधित गावात जाऊन ग्रामस्वच्छता करतात. त्याचबरोबर नागरिकांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व रुजविणे, वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धना बाबत जागृती करणे, व्यसनमुक्तीचा संदेश देणे तसेच अंधश्रद्धा निर्मूलनासाठी जनजागृती करणे, अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.



या सातत्यपूर्ण कायामुळे आतापर्यंत मंडळाने नागपूर जिल्ह्यातील ७० गावांमध्ये पोहोचून सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबविले आहेत. रविवारी लोणारा येथे आयोजित कार्यक्रमाची सुरुवात रामधुनीने करण्यात आली. रामधुनीच्या माध्यमातून गावात जनजागृती करीत परिसरातील स्वच्छता करण्यात आली.

गावाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वच्छतेबरोबरच सामाजिक एकोपा, पर्यावरणाचे रक्षण आणि व्यसनमुक्त जीवनशैली आवश्यक असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामविकास, श्रमदान, स्वच्छता, सामाजिक समता आणि सामुदायिक प्रार्थनेच्या माध्यमातून आदर्श समाजनिर्मितीचा संदेश दिला. त्यांच्या याच विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने मंडळाच्यावतीने गावांमध्ये ग्रामगीता आणि सामुदायिक प्रार्थनेच्या पुस्तकांचे वाटप करण्यात येते. लोणारा येथेही या पुस्तकांचे वाटप करून गावात दर गुरुवारी सामुदायिक प्रार्थना घेण्याचे ठरविण्यात आले.

या कार्यक्रमात गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. रामदास टेकाडे, सचिव रमेश सोनकुसरे, सहसचिव सतीश राईकवार, कोषाध्यक्ष मधुकर धोटे, सहकोषाध्यक्ष दामोदर मामूलकर, रामराव डांगोरे, यशवंत निकडे, अरुण राऊत, गुंडेराव ठाकरे, मनोहर हेडाऊ, नामदेव बालपांडे, राजीव देवगडे, मदन मुदगल, विजय गिरी, निळकंठ बारबद्दे आणि सुरेश परते, वसंतराव फरतोडे यांच्यासह मंडळाचे इतर सदस्य उपस्थित होते. तसेच लोणारा गावचे सरपंच पेठे आणि गावातील नागरिकांनीही या उपक्रमात सहभाग घेतला. यावेळी प्रा.रामदास टेकाडे, गुंडेराव ठाकरे आणि यशवंत निकडे यांनी आपल्या मनोगतातून ग्रामस्वच्छता, सामाजिक प्रबोधन आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचे महत्त्व विशद केले.

लोणारा येथे रामधून काढून ग्रामस्वच्छता; वृक्षारोपण, व्यसनमुक्ती आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश

स्वच्छता, वृक्षारोपण, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन आणि पर्यावरण जनजागृती हे उपक्रम केवळ एका दिवसापुरते मर्यादित न राहता लोकचळवळीचे स्वरूप धारण करणे आवश्यक असल्याची भूमिकाही त्यांनी मांडली. कार्यक्रमाच्या शेवटी सरपंच पेठे यांनी उपस्थित मंडळाचे पदाधिकारी, सदस्य आणि ग्रामस्थांचे आभार मानले. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. गुरुदेव सेवा मंडळाच्या या सातत्यपूर्ण उपक्रमामुळे ग्राम स्वच्छतेसोबतच सामाजिक जागृती आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा प्रसार ग्रामीण भागात होत असून, ७० गावांपर्यंत पोहोचलेले हे अभियान समाजसेवेचा दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.

नवरात्रोत्सवानिमित्त जराई मराई माता मंदिरात जस गायन

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

शहराच्या सीमेवर असलेल्या ग्रामदेवता जराई मराई माता मंदिरात शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत १८ ऑक्टोबर रोजी लंबे हनुमान महिला मंडळाच्यावतीने माता जस गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी भाविकांनी भक्तिभावाने माता जराई मराईची आराधना केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंदिर व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विश्वनाथ कापसे, उपाध्यक्ष सूर्यभान बालपांडे, सचिव संजय वाडीभस्मे, चोपलाल राहांगडाले, ओमप्रकाश आष्टणकर, महेंद्रसिंग सूर्यवंशी, दिलीप कामळे, सत्यभामा सावरकर, डॉ. गणेश चकोले, प्रेमलाल पोटभरे, गोपी कोल्हेपरा, पंकज वाघमारे आणि विवेक खंडाळे यांच्यासह समितीचे अन्य सदस्य परिश्रम घेत आहेत.



शटरफोडी करून दुचाकी चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

नांदेड : शहरासह जिल्ह्यातील विविध भागांत दुकानांचे शटर फोडून चोरी करणाऱ्या तसेच दुचाकी चोरणाऱ्या आरोपींचा स्थानिक गुन्हे शाखेने पदार्फाश केला आहे. पोलिसांनी एका १७ वर्षीय विधिसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून चोरीच्या गुन्ह्यांतील १ लाख ८०० रुपये रोख आणि दोन दुचाकी, असा एकूण २ लाख ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत दुकानफोडीचे नऊ आणि दुचाकी चोरीचे दोन, असे एकूण ११ गुन्हे उघडकीस आले आहेत. विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत घडलेल्या चोरीच्या गुन्ह्यांतील अज्ञात आरोपींचा शोध घेत होते. दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी सहायक पोलिस निरीक्षक रवी बाघाळे व त्यांचे पथक नदिड शहर आणि जिल्ह्यातील मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांतील आरोपींचा शोध घेण्यासाठी गस्त घालत होते. याचदरम्यान पथकाला गुप्त बातमीदाराकडून दुकानाचे शटर फोडून चोरी करणारा आरोपी उमरी येथे असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

जलालखेड्यात भरधाव कारची दुचाकीला धडक, डिलिव्हरी बॉय गंभीर!

मोबाईलवर बोलणे अन् शॉर्टकटचा प्रयत्न पडला महागात? पुनर्वसन परिसरातील अपघातात दुचाकीचा चक्काचूर, कारमधील महिलेलाही किरकोळ दुखापत

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

नरखेड तालुक्यातील जलालखेडा येथील पुनर्वसन परिसरात रविवार, १८ ऑक्टोबर रोजी दुपारी सुमारे २.३० वाजताच्या सुमारास भरधाव कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात डिलिव्हरी बॉय गंभीर जखमी झाला. साहिल ज्ञानेश्वर मरस्कोल्हे (वय २७, रा. दिग्रस (भाऊसाहेब), ता. काटोल) असे जखमी तरुणाचे नाव आहे. अपघातात दुचाकीचे मोठे नुकसान झाले असून कारमधील एका महिलेलाही किरकोळ दुखापत झाली आहे. या घटनेमुळे महामार्गावरील वाहतुकीच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.







मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर येथून वरूडच्या दिशेने जाणारी एमएच ०४ एचएक्स ९१०२ क्रमांकाची कार जलालखेडा येथील पुनर्वसन परिसरातून जात असताना एमएच ४० डीके ०३९४ क्रमांकाच्या दुचाकीला जोरदार धडक बसली. या धडकेत दुचाकीस्वार साहिल मरस्कोल्हे गंभीर जखमी झाला. अपघाताची तीव्रता इतकी होती की दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले.

घटनेची माहिती मिळताच जलालखेडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी साहिलला तातडीने जलालखेडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, त्याची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी नागपूर येथे पाठविण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ठाणेदार विनोद जांभळे यांच्या मार्गदर्शनाखाली जलालखेडा पोलीस पुढील तपास करीत आहेत.

मोबाईलवर बोलणे आले अंगलट?

साहिल हा डिलिव्हरी बॉय म्हणून काम करीत असून, पार्सल पोहोचविण्यासाठी तो काटोल येथून जलालखेडा येथे आला होता. अपघाताच्या वेळी तो दुचाकीवरून रस्ता ओलांडत असताना मोबाईलवर बोलत असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितल्याचे समजते. त्यामुळे त्याचे लक्ष समोरून येणाऱ्या कारकडे गेले नसावे, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, अपघाताचे नेमके कारण पोलीस तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. वाहन चालविताना मोबाईलचा वापर किती धोकादायक ठरू शकतो, हे या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

शॉर्टकटचा प्रयत्न ठरला धोकादायक!

जलालखेडा ते वरूड हा महत्त्वाचा महामार्ग असून, या मार्गावरून वाहने वेगाने धावत असतात. रस्त्याच्या मध्यभागी दुभाजक असल्याने एका बाजूवरून दुसऱ्या बाजूला जाण्यासाठी ठरावीक ठिकाणीच मार्ग उपलब्ध आहे. पुनर्वसन परिसरात रस्ता ओलांडण्यासाठी असलेल्या छोट्या मार्गाचा पादचारी वापर करतात. याच ठिकाणाहून दुचाकीने रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न केल्याने अपघात घडल्याची माहिती समोर येत आहे. महामार्गावरून जाताना घाईघाईने शॉर्टकट घेणे जीवावर बेतू शकते, हे या घटनेने पुन्हा स्पष्ट केले.

देवदर्शनासाठी निघालेल्या कुटुंबाच्या प्रवासात अपघात

कारमधील कुटुंब नागपूर येथील रहिवासी असून, ते वरूडजवळील एका मंदिरात देवदर्शनासाठी जात होते, अशी माहिती आहे. मात्र, प्रवासादरम्यान जलालखेडा येथील पुनर्वसन परिसरात हा अपघात घडला. कारमधील एका महिलेला किरकोळ दुखापत झाली. या घटनेमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली.

वाहनचालकांनी सावध राहण्याची गरज

महामार्गावर वाहन चालविताना वेगावर नियंत्रण ठेवणे, रस्ता ओलांडण्यापूर्वी दोन्ही बाजूंच्या वाहतुकीचा अंदाज घेणे आणि दुचाकी चालविताना मोबाईलचा वापर टाळणे अत्यंत आवश्यक आहे. काही क्षणांची घाई किंवा निष्काळजीपणा गंभीर अपघाताला कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करून स्वतःसह इतरांच्याही जीवाची काळजी घेण्याची गरज आहे.

थोडक्यात

बालमित्र नवदुर्गोत्सव मंडळातर्फे दहा नवदुर्गा मूर्तींची स्थापना



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

शहरातील पापदुपेश्वर वॉर्डातील सार्वजनिक बालमित्र नवदुर्गोत्सव मंडळातर्फे शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त नवदुर्गेच्या दहा विविध रूपांतील विलोभनीय मूर्तींची स्थापना करण्यात आली आहे. या मूर्ती रामटेक शहरातील नागरिकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरल्या असून, त्या पाहण्यासाठी भाविकांची गर्दी होत आहे.

बालमित्र नवदुर्गोत्सव मंडळाची स्थापना १९५१ मध्ये झाली असून, यंदा मंडळाच्या नवदुर्गोत्सवाचे ७५ वे वर्ष आहे. या विशेष वर्षानिमित्त मंडळाने खापा (सावनेर) येथून नवदुर्गेच्या दहा आकर्षक मूर्ती आणल्या आहेत. यामध्ये सिद्धिदात्री, शैलपुत्री, स्कंदमाता, चंद्रघंटा, महागौरी, ब्रह्मचारिणी, कात्यायनी, कूष्मांडा, कालरात्री आणि दुर्गामातेच्या मूर्तींचा समावेश आहे. नवदुर्गेच्या विविध रूपांचे दर्शन घडविणाऱ्या या मूर्तींची आकर्षक मांडणी करण्यात आली आहे. मंडळाच्या या देखाव्याचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. नवरात्रोत्सवानिमित्त मंडळातर्फे विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ही माहिती मंडळाचे अध्यक्ष किशोर वंजारी व पदाधिकारी यांनी दिली.

पूर्ती पब्लिक स्कूलच्या वंशिका सोनवानेचे मैदानी स्पर्धेत उल्लेखनीय यश

१०० व २०० मीटर धावण्यात द्वितीय क्रमांक; विभागीय स्तरावर निवड



दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

पूर्ती पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनी कु. वंशिका लखन सोनवाने हिने मैदानी क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. अंडर-१९ वयोगटातील १०० मीटर व २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तिने द्वितीय क्रमांक पटकावला. या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर तिची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. वंशिकाने मिळविलेल्या या यशाबद्दल पूर्ती पब्लिक स्कूलच्यावतीने तिचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थाध्यक्ष शालिनीताई बडोले, संस्था सचिव डॉ. राजेंद्र बडोले, प्राचार्य प्रशांत बंसोड, क्रीडा शिक्षक अजय सयाम, ओमप्रकाश नेवारे, लोकेश चन्ने, रोहिणी तिरपुडे आणि रिंपी शर्मा उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी वंशिकाचे अभिनंदन करून आगामी विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थिनीने क्रीडा क्षेत्रात मिळविलेल्या या यशामुळे शाळेच्या नावलौकिकात भर पडली आहे. तिच्या या यशाबद्दल शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी आनंद व्यक्त करत तिचे अभिनंदन केले. तसेच आगामी स्पर्धेतही उत्तम कामगिरी करून यशाची परंपरा कायम राखावी, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.

नवरात्रोत्सव अभियानांतर्गत जुन्या सालेकसा जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप



दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे आणि त्यांना शैक्षणिक साहित्याअभावी शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, या उद्देशाने नवरात्रोत्सव अभियानांतर्गत जुन्या सालेकसा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या व पेनचे वाटप करण्यात आले. उत्कृष्ट साहित्यिक, आदर्श शिक्षक, फुलेप्रेमी, संविधानदूत व मार्गदर्शक विजय वडवेराव सर, पुणे यांच्या प्रेरणेतून दरवर्षी महाराष्ट्रभर नवरात्रोत्सव अभियान विविध क्षेत्रांत राबविण्यात येते. या अभियानांतर्गत गरजू विद्यार्थ्यांना नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून नऊ दिवस विविध प्रकारच्या शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येते.याच अभियानाचा एक भाग म्हणून सालेकसा येथील कवयित्री डॉ. किरणताई मोरे चव्हाण यांनी १७ ऑक्टोबर रोजी जुन्या सालेकसा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या व पेनचे वाटप केले.

शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना दरवर्षी वेगवेगळे शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रमावेळी शाळेचे मुख्याध्यापक डी. बिसेन सर उपस्थित होते. त्यांनी डॉ. किरणताई मोरे चव्हाण यांचे आभार मानून त्यांचा सन्मान केला. या उपक्रमासाठी उत्कृष्ट समाजसेवक बाजीराव तरोणे, रसिका मोरे तसेच शाळेतील इतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळत असून, समाजातील दानशूर व्यक्तींनीही अशा उपक्रमांत सहभागी व्हावे, असा सकारात्मक संदेश या माध्यमातून देण्यात आला.

दीक्षाभूमी परिसरातील सोई-सुविधांच्या तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

सुविधांचे काम जवळजवळ पुर्ण, अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून काम करण्याचे निर्देश

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त देशभरातून दीक्षाभूमी येथे येणाऱ्या अनुयायांसाठी उभारण्यात येत असलेल्या सोई-सुविधांच्या तयारीचा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आढावा घेतला. अनुयायांची उपस्थिती वाढावला लागल्यामुळे निर्धारीत सर्व बाबी वेळेत पुर्ण करा. नोडल अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून सर्व बाबी वेळेत पुर्ण होतील याकडे लक्ष देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. नियोजन भवन येथे आयोजित बैठकीला अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, समाजकल्याणच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांच्यासह व्यवस्थेसाठी



नेमण्यात आलेल्या विभागांचे नोडल अधिकारी उपस्थित होते.

यावर्षी पहिल्यांदाच लांबून दीक्षाभूमी येथे येणाऱ्या अनुयायांसाठी निवास व्यवस्था करण्यात आली आहे. एकून २४ ठिकाणी साकारण्यात आलेली ही व्यवस्था पुर्ण झाली असून तेथे अनुयानांना अंथरून, पांघरुन व आवश्यक बेडींग सुविधा, स्वच्छ पिण्याचे पाणी, वीज, स्वच्छता, तक्रार निवारण प्रणालीचा जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेतला. निवासाच्या ठिकाणी अनुयायांना कोणत्याही प्रकारची अडचण जाणार नाही, यासाठी संबंधित विभागाने काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

दीक्षाभूमी परिसरात दोन दिवस मोठ्या संख्येने गर्दी राहणार आहे. त्यामुळे गर्दी व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्था, अनुयायांच्या सोईसाठी नियंत्रण कक्ष, आरोग्य कक्ष, सीसीटीव्ही यंत्रणा अंतीम टप्यात असून आजपासूनच या सर्व बाबी कार्यान्वित झाल्या पाहिजे. अनुयायांना परिसरात शुद्ध पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पुर्ण वेळ पाणी उपलब्ध राहिले पाहिजे. स्वच्छतागृहे निर्धारीत ठिकाणी ठेवण्यासोबतच त्यांची निधारीत वेळेत नियमित देखभाल, त्यासाठी आवश्यक पाणी उपलब्धता, याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी सुचना केल्या.

सुव्यवस्थेसाठी स्वयंसेवकांची भूमिका महत्वाची

दीक्षाभूमी परिसरात मोठ्या प्रमाणावर स्वयंसेवक नेमले जाणार आहे. या स्वयंसेवकांशी जिल्हाधिकाऱ्यांनी वैयक्तिक संवाद साधला. धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात आणि चांगल्या वातावरणात पार पाडण्यासाठी स्वयंसेवकांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. स्वयंसेवकांनी प्रत्येकाशी चांगला संवाद साधत त्यांच्या अडीअडचणी, त्यांना आवश्यक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी योगदान द्यावे, असे जिल्हाधिकारी म्हणाले.

निवास व्यवस्थेला १५ कोटींचे विमा कवच

यावर्षी उभारण्यात आलेल्या निवास व्यवस्थेत हजारो अनुयायांची सोय होणार आहे. याठिकाणी वास्तव्यास असलेल्या अनुयायांना विम्याचे सुरक्षा कवच उपलब्ध करून देण्यात आले आहे. निवारा कक्षात अनुचित घटना घडल्यास १० कोटी तर आगीसारखी घटना घडल्यास त्यासाठी ५ कोटी असा १५ कोटी रुपयांचा विमा प्रशासनाच्यावतीने काढण्यात आला आहे.

बालकांच्या हातावर मोबाईल क्रमांकाचे बेल्ट

दोन दिवस दीक्षाभूमी येथे लाखो अनुयायांची उपस्थिती राहणार आहे. गर्दीमुळे पालकांसोबत आलेली बालके हरविण्याची शक्यता असते. असे झाल्यास बालके लगेच सापडावे यासाठी येथे येणाऱ्या प्रत्येक बालकाच्या हातावर बेल्ट लावल्या जाणार आहे. बेल्टवर पालकांचे नाव व त्यांचा मोबाईल क्रमांक राहतील. दीक्षाभूमीकडे प्रवेश करणाऱ्या प्रत्येक मार्गावर समाजकल्याणच्या वसतीगृहातील विद्यार्थी प्रवेशावेळीच बालकांचा हातावर हा बेल्ट बांधतील. जवळजवळ २५ हजार बेल्ट यासाठी मागविण्यात आले आहे.

मानकापूर स्टेडियमवरील मतमोजणी केंद्र व निवडणूक तयारीचा निवडणूक निरीक्षक डॉ. हर्षदीप कांबळे यांच्याकडून आढावा

सर्व तयारी वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश, नागपूर पदवीधर मतदारसंघ निवडणूक

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर पदवीधर मतदार संघासाठी येत्या २३ ऑक्टोबर रोजी मतदान होणार असून २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. याअनुषंगाने निवडणूक निरीक्षक डॉ. हर्षदीप कांबळे यांनी आज मानकापूर स्टेडियम येथील मतमोजणी केंद्राची पाहणी केली. तसेच विभागीय आयुक्त कार्यालय येथे प्रशासकीय तयारीचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या महत्त्वाच्या सूचना करीत सर्व तयारी वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश निवडणूक निरीक्षक डॉ. हर्षदीप कांबळे यांनी दिले.

पाहणीदरम्यान त्यांनी मानकापूर स्टेडियम येथील मतमोजणी टेबलची रचना, बैठक व्यवस्था, उमेदवार व पोलिंग एजंट यांच्या बसण्याची व्यवस्था तसेच मतपेट्या सुरक्षित ठेवण्यात येणाऱ्या 'स्ट्रॉंग रूम'ची सविस्तर पाहणी केली. याशिवाय, मतमोजणीच्या दिवशी होणारी वाहनांची गर्दी लक्षात घेऊन पार्किंग व्यवस्थेची पाहणी केली व मानकापूर स्टेडियम येथील नागपूर जिल्ह्याच्या 'साहित्य स्वीकृती केंद्राची'ही माहिती घेतली. याप्रसंगी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रचना इंदूरकर यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सरपंच भवन येथून पोलिंग पार्ट्या रवाना

निवडणूक निरीक्षक डॉ. हर्षदीप कांबळे यांनी सरपंच भवनाला भेट देऊन नागपूर जिल्ह्यातील पोलिंग पार्ट्यांच्या प्रस्थान तयारीचा आढावा घेतला. सरपंच भवनातून पोलिंग पार्ट्या रवाना होणार असून, तिथे मतपत्रिकांसाठी तयार करण्यात आलेली स्ट्रॉंग रूम, साहित्य वितरणासाठी मांडण्यात आलेले टेबल आणि गाड्यांच्या ये-जा करण्याच्या व्यवस्थेची त्यांनी पाहणी केली.

विभागीय आयुक्त कार्यालयात उच्चस्तरीय आढावा बैठक

यानंतर विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडलेल्या बैठकीत नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या तयारीचा सखोल आढावा त्यांनी घेतला. निवडणूक शाखेकडून निवडणुकीच्या तयारीची सविस्तर माहिती सादर करण्यात आली. निवडणुकीची तयारी अंतिम टप्यात असून पूर्णत्वास आली असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी यावेळी सांगितले. या बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अतिरिक्त विभागीय आयुक्त तुषार मठकर, अपर आयुक्त प्रदीप कुलकर्णी, अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी रचना इंदूरकर यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

निवडणूक निरीक्षक डॉ. हर्षदीप कांबळे यांचा निवासाचा पत्ता कॅटिज नं. ७ रवी भवन, नागपूर असा असून त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ८२०८५४०१९० असा असल्याचे निवडणूक विभागातर्फे कळविण्यात आले आहे.

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त पूर्ती पब्लिक स्कूल, सालेकसा येथे उत्साहपूर्ण दांडिया सोहळा

विद्यार्थी व महिलांच्या उत्स्फूर्त सहभागाने कार्यक्रमाला लाभली सांस्कृतिक रंगत



दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे सालेकसा

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त पूर्ती पब्लिक स्कूल, सालेकसा, मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था, रेंगेपार/कोहळी द्वारा संचालित वीर बिरसा मुंडा आदिवासी आश्रमशाळा, सालेकसा, एस. आर. बी. महिला महाविद्यालय, सालेकसा आणि खिलेश महाविद्यालय, सालेकसा यांच्या संयुक्त आयोजनातून उत्साहपूर्ण दांडिया सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सविताताई संजयजी पुराम, माजी सभापती, महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया उपस्थित होत्या. उद्घाटन श्रीमती प्रतिभाताई परिहार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्रीमती शालिनीताई बडोले, अध्यक्ष, मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था आणि डॉ. राजेंद्रजी बडोले सर सचिव, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रतिभाताई शिवणकर, प्रेरणाताई बंडीवार नगरसेविका सालेकसा, हेमलताताई वैद्य, उपाध्यक्ष, सालेकसा जयश्रीताई साखरे प्रा. किरण साखरे मॅडम गणेश बिसेन सर तसेच येटरे ताई तसेच प्राचार्य एच. ए. चौधरी सर, वीर बिरसा मुंडा शाळा, सालेकसा मुख्याध्यापक पी. एस. लोधे सर, वीर बिरसा मुंडा शाळा, सालेकसा प्रशांत बनसोड सर, प्राचार्य, पूर्ती पब्लिक स्कूल, सालेकसा आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी असलेल्या सविताताई संजयजी पुराम यांनी अध्यक्षीय भाषणातून सांगितले की, नवरात्रोत्सव हा आपल्या संस्कृती, परंपरा आणि एकतेचा उत्सव आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. उद्घाटक प्रतिभाताई परिहार यांनी उद्घाटनिय भाषणातून सांगितले की, 'दांडिया हा आनंद, उत्साह आणि सांस्कृतिक एकतेचे प्रतीक आहे. सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन हा उत्सव आनंदाने साजरा करावा.'

दांडिया नृत्य स्पर्धेत सुपर मॉम ग्रुपने प्रथम क्रमांक, नवरंग ग्रुपने द्वितीय क्रमांक तर सावित्रीबाई फुले ग्रुपने तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेचे परीक्षण राकेश रोकडे सर, नेहा शर्मा मॅडम आणि एच. ए. चौधरी सर यांनी केले. विजेत्यांना रोख पारितोषिके, आकर्षक बक्षिसे व प्रमाणपत्रे देण्यात आली. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, सांस्कृतिक जाणीव, आत्मविश्वास, सांघिक सहभाग आणि सहकार्याची भावना विकसित व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या दांडिया सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाला पालकवर्ग, प्रेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन डॉ. सरस्वता पटले, विभागप्रमुख, एस. आर. बी. महिला महाविद्यालय, सालेकसा आणि खुमेश पटले सर यांनी केले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी जे. एम. चादेवार सर यांनी उपस्थित मान्यवर, पालकवर्ग, प्रेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.

प्रणाली प्रभुदास तेलमोरे हिची आरोग्य विभागात नर्सिंग ऑफिसर म्हणून निवड

नियुक्तीने चिनोरा गावात आनंदाचे वातावरण, आमदार करण देवतळे यांच्या हस्ते प्रणालीचा सत्कार

दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे

चिनोरा येथील प्रणाली प्रभुदास तेलमोरे हिने महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागातील बीएससी नर्सिंग आधारित नर्सिंग ऑफिसर पुर्व परीक्षा व अंतिम परीक्षा उत्तीर्ण केली असून तीची निवड झाली आहे. प्रणाली तेलमोरे हिने मुंबई येथील बॉम्बे नर्सिंग हॉस्पिटल मुंबई येथे बीएससी नर्सिंग चे शिक्षण पूर्ण केले असून नुकत्याच झालेल्या



महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागातील स्टाप नर्स व नर्सिंग ऑफिसर च्या झालेल्या परीक्षेमध्ये भाग घेतला व नर्सिंग ऑफिसर पदाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे चिनोरा परिसरातील वार्डामध्ये आनंदाचे वातावरण आहे. आई सुशीला प्रभुदास तेलमोरे या चिनोरा ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच आहे त्या सामाजिक कार्यात सहभागी होत असतात. प्रणाली चे वडील शात नाही, त्यामुळे आईचे मोलाचे मार्गदर्शन मला लाभल्याने मी यश गाठल्याचे प्रणालीचे म्हणणे आहे.

वरोरा भद्रावती विधानसभा मतदारसंघाचे आमदार करण देवतळे यांच्या हस्ते कुमारी प्रणाली प्रभुदास तेलमोरे हिचा एका कार्यक्रमात प्रणालीचा आ. करण देवतळे यांच्या हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी धर्मेंद्र शेरकुरे, ग्रामीण भाजपाचे तालुका उपाध्यक्ष तथा महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष दिवाकर नन्नावरे, ग्रामपंचायत सदस्य निलेश डोंगरकर, भाजपाचे तालुका उपाध्यक्ष प्रकाश झाडे, सुशीला तेलमोरे,याची उपस्थिती होती.

शितला माता हनुमान मंदिर, अंबिका नगर येथे 'गरबा महोत्सव'









दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : दक्षिण नागपुरातील शितला माता हनुमान मंदिर, अंबिका नगर येथील देवस्थान मागील ३२ वर्षांपासून नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने सातत्याने विविध उपक्रमांसह सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करते. यंदा देवस्थानातर्फत आयोजित केलेल्या भव्य गरबा महोत्सवात मोठ्या प्रमाणात भक्तांनी सहभाग घेत, कौतुक केले. गरबा महोत्सवात प्रथम क्रमांक महागौरी गरबा ग्रुप, व्दितीय क्रमांक कृष्णरस गरबा ग्रुप, तृतीय क्रमांक बालगोपाल गरबा ग्रुप यांनी पटकाविला.

पुरस्कार वितरण करतेवेळी प्रभाग ३२ च्या नगरसेविका रूपाली ठाकुर, परशु ठाकुर, स्कायलॅब भनारे, वंदना काकडे, प्रफुल काकडे, रूपाली कळंबे, श्री. साखरकर यांच्यासह देवस्थानचे अध्यक्ष सोनु पोकळे, कार्याध्यक्ष अंकित काकडे, सौरभ सोंडे, गुणवंत कळंबे, आशु जाधव, गौरव ठाकरे, अक्षय गभणे, प्रियंका राऊत, तृप्ती बल्लमवार, अमोल कावळे यांची उपस्थिती होती. जागरण, भजन, किर्तन, आनंद मेळावा, चिमुकल्यांची चित्रकला स्पर्धा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. २३ तारखेला भव्य महाप्रसादाने नवरात्रोत्सवाची सांगता होईल. करिता देवस्थानामार्फत आयोजित कार्यक्रमाचा लाभ सर्व भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.